# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८
## मा.महापालिका सभा
## कार्यपत्रिका क्रमांक -४७
## सभावृत्तांत

दिनांक :- २०.०५.२०१० वेळ :- दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे मे-२०१० ची मासिक मा.महापालिका सभा गुरुवार दि.२०.५.२०१० रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.बहल योगेश मंगलसेन महापौर
२. मा.आसवानी डब्बु उपमहापौर
३. मा.भालेकर शांताराम कोंडीबा
४. मा.जाधव विजया अशोक (मामी)
५. मा.थोरात एकनाथ दादा
६. मा.दत्तात्रय बाबुराव साने
७. मा.लोखंडे सुजाता सुनिल
८. मा.जाधव माऊली उर्फ ज्ञानेश्वर
९. मा.बो-हाडे शरद परशुराम
१०. मा.आल्हाट शांता महेंद्र
११. मा.डॉ. सौ. मीना पाटील
१२. मा.कुंभार रामदास तानाजी
१३. मा.सौ.सारिकाताई संतोषभाऊ लांडगे
१४. मा.सौ. बढे सुलोचना बबन
१५. मा.गवळी विजया पंडित
१६. मा.अजित दामोदर गव्हाणे
१७. मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे
१८. मा.महेश किसन लांडगे
१९. मा.फुगे सुनंदाताई विजय
२०. मा.आशा अंकुश लांडगे
२१. मा.मोहिनी विलास लांडे

२२. मा.लोंढे संतोष ज्ञानेश्वर
२३. मा.सौ. वर्षा विलास मडीगेरी
२४. मा.सावळे सिमा
२५. मा.राजेश उर्फ रामकृष्ण गोविंद स्वामी पिल्ले
२६. मा.भोसले हनुमंतराव भिमराव
२७. मा.यशवंत भोसले
२८. मा.कदम निर्मला सदगुरु
२९. मा.सौ.गुंजेकर स्मिता रमेश
३०. मा. चौधरी अख्तरहुसेन तालुकदार
३१. मा.काळूराम मारुती पवार
३२. मा.आझम फकीरभाई पानसरे
३३. मा. चांदगुडे महेश गंगाराम
३४. मा.भापकर मारुती साहेबराव
३५. मा.शेट्टी जगदिश
३६. मा.सौ. मंगलाताई अशोक कदम
३७. मा.बोबडे भिमा सखाराम
३८. मा.उबाळे सुलभा रामभाऊ
३९. मा.तानाजी विठ्ठल खाडे
४०. मा.सुमनताई मधुकर पवळे
४१. मा.कुमार आर. एस.
४२. मा.उल्हास शेट्टी
४३. मा.जावेद शेख
४४. मा.भालेराव ज्ञानेश्वर निवृत्ती
४५. मा.कुटे गोपाळ नाना
४६. मा.शरद उर्फ राजू मिसाळ
४७. मा.भोंडवे तुकाराम महादू
४८. मा.गणेश तुकाराम भोंडवे
४९. मा.साळुंके राजेंद्र गुलाबराव
५०. मा.वाघ रघुनाथ दलपत
५१. मा.सौ. आशा ज्ञानेश्वर सुर्यवंशी
५२. मा.भाऊसाहेब सोपानराव भोईर
५३. मा.तिकोने हरिभाऊ किसन
५४. मा.बाराहाते शरद भगवंतराव
५५. मा.अपर्णा निलेश डोके

५६. मा.गावडे  जयश्री वसंत
५७. मा.साबळे  जगन्नाथ दगडू
५८. मा.गुरुबक्ष किसनदास पहलानी
५९. मा.रामआधार धारिया
६०. मा.सौ.वाघेरे उषा संजोग
६१. मा.वाघेरे प्रभाकर नामदेव
६२. मा.विठ्ठल ऊर्फ नाना काटे
६३. मा.बाळासाहेब उर्फ खंडुशेठ दगडु कोकणे
६४. मा.तापकीर मच्छिंद्र भाऊसाहेब
६५. मा.भारती ज्योती सुखलाल
६६. मा.कोकणे संतोष अंकुश
६७. मा.दरेकर सतीश दगडू
६८. मा.आण्णा ऊर्फ मनोहर पवार
६९. मा.बारणे संतोष नागु
७०. मा.बारणे सिध्देश्वर बाळासाहेब
७१. मा.बारणे श्रीरंग चंदु ऊर्फ आप्पा
७२. मा.कलाटे कमल तानाजी
७३. मा.आदियाल (शीख) शोभा गुरुमितसिंग
७४. मा.सौ. नांदगुडे सुजाता विलास
७५. मा.खोमणे लता हनुमंत
७६. मा.अशोकभाई सोनवणे
७७. मा.जगताप शंकर पांडुरंग
७८. मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब
७९. मा.एकनाथ मोटे
८०. मा.सौ. गावडे सुषमा गोविंद
८१. मा.गायकवाड सुरदास तुकाराम
८२. मा.काटे राजेंद्र भिकनशेठ
८३. मा.नितीन ऊर्फ सनी रामचंद्र ओव्हाळ
८४. मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण
८५. मा.सुपे भाऊसाहेब रामभाऊ
८६. मा.डॉ.वैशालीताई घोडेकर
८७. मा.श्री.बाबर प्रकाश धरमसी
८८. मा. हनुमंत बाळासाहेब गावडे
८९. मा. उत्तम मुक्ताजी हिरवे

९०. मा. विनायक सुरेश रणसुभे
९१. मा. प्रेमकुमार शंकरन नायर ऊर्फ बाबू नायर
९२. मा. एकनाथ रावसाहेब पवार

याशिवाय मा.सावंत-सहा.आयुक्त, मा.धाडगे-मुख्यलेखा परिक्षक, मा.काळे-नगरसचिव, मा.लोंढे-मुख्य लेखापाल, मा.पाटील-उपसंचालक (नगररचना), मा.सुरगूडे-विकास अभियंता, मा.डॉ. अय्यर-वैद्यकीय संचालक, मा.जाधव, मा.दुधेकर-कार्यकारी अभियंता, मा.माछरे-विशेष अधिकारी, मा.पवार-प्रशासन अधिकारी (अस्था.), मा.गायकवाड-जनतासंपर्क अधिकारी, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

--------------------

मा.महापौर :- उपस्थित मा.नगरसेवक व नगरसेविका, आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

मा.ज्ञानेश्वर भालेराव :- मा.महापौर साहेब, माजी उपराष्ट्रपती-भैरोसिंह शेखावत,ज्येष्ठ कॉंग्रेसनेत्या व राजस्थानच्या राज्यपाल-प्रभा राव, माजी नगरसदस्य-मच्छिंद्र ढोरे, ज्येष्ठ चित्रपट अभिनेते-मॅक मोहन, श्रीकांत पटवर्धन व सुनिल नायर, सौ.कल्पना विठ्ठल सुर्यवंशी, श्रीमती श्रृती श्रीधर धारवाडकर,विक्रम गायकवाड,बाबु भालेराव यांचे दु:खद निधन झालेले असल्याने त्यांना तसेच कर्नाटक येथील अपघातात आकुर्डीमधील (रघुनाथ पांडुरंग पांढरकर व रेवती रघुनाथ पांढरकर)पांढरकर- मोरे कुटुंबातील मृत्युमुखी पडलेल्या ८ मृत व्यक्तींना तसेच दंतेवाडा येथे झालेल्या नक्षलवादी हल्ल्यात जवानांसह मृत्युमुखी पडलेल्या ५० मृत व्यक्तींना श्रध्दांजली वाहणेत यावी.

मा.उल्हास शेट्टी :- मा.महापौर साहेब, अनुमोदन देतो.

मा.महापौर :- सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण करावी.
( सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)

------------

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, माजी उपराष्ट्रपती भैरोसिंह शेखावत यांचे व इतर मान्यवरांचे निधन झालेले असल्याने १५ मिनिटे सभा तहकूब करणेत यावी.

मा.विनायक रणसुभे :- मा.महापौर साहेब, अनुमोदन देतो.

मा.यशवंत भोसले :- मा.महापौर साहेब, माजी उपराष्ट्रपती भैरोसिंह शेखावत आणि या राज्याच्या हितासाठी ज्यांनी आपले सर्वस्व पणाला लावले त्या प्रभाताई यांचे निधन झालेले आहे माजी सदस्य मच्छिंद्र ढोरे यांचे निधन झालेले आहे किमान १५ दिवसासाठी तरी सभा तहकूब करावी. महापौर साहेब निश्चितच आम्ही तुमचे कौतूक करतो कारण आपण कुठल्याही प्रकारची सभा तहकूब केलेली नाही परंतु जेव्हा अशी घटना घडते त्यावेळेला सदस्यांचा मान राखून १५ दिवसतरी सभा तहकूब करावी.

मा.महापौर :- उपस्थित सन्मा.सदस्यांच्या भावना विचारात घेवुन त्यांच्या संमतीप्रमाणे गुरुवार दि. २०.०५.२०१० रोजी दुपारी २.३० पर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

(बहल योगेश मंगलसेन)
महापौर
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८
मा.महापालिका सभा
कार्यपत्रिका क्रमांक -४७
सभावृत्तांत
(दि. २०.०५.२०१० (दु.२.०० )ची तहकूब सभा)

दिनांक :- २०.०५.२०१० वेळ :- दुपारी २.३० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची दि.२०.०५.२०१० (दु. २.००) ची तहकूब मा.महापालिका सभा गुरुवार दि.२०.५.२०१० रोजी दुपारी २.३० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.बहल योगेश मंगलसेन महापौर
२. मा.आसवानी डब्बु उपमहापौर
३. मा.भालेकर शांताराम कोंडीबा
४. मा.जाधव विजया अशोक (मामी)
५. मा.थोरात एकनाथ दादा
६. मा.दत्तात्रय बाबुराव साने
७. मा.आल्हाट शांता महेंद्र
८. मा.डॉ. सौ. मीना पाटील
९. मा.कुंभार रामदास तानाजी
१०. मा.सौ.सारिकाताई संतोषभाऊ लांडगे
११. मा.सौ. बढे सुलोचना बबन
१२. मा.गवळी विजया पंडित
१३. मा.अजित दामोदर गव्हाणे
१४. मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे
१५. मा.महेश किसन लांडगे
१६. मा.फुगे सुनंदाताई विजय
१७. मा.आशा अंकुश लांडगे
१८. मा.लोंढे संतोष ज्ञानेश्वर
१९. मा.सौ. वर्षा विलास मडीगेरी
२०. मा.सावळे सिमा
२१. मा.राजेश उर्फ रामकृष्ण गोविंद स्वामी पिल्ले
२२. मा.यशवंत भोसले

२३. मा.कदम निर्मला सदगुरु
२४. मा.सौ.गुंजेकर स्मिता रमेश
२५. मा. चौधरी अख्तरहुसेन तालुकदार
२६. मा.काळूराम मारुती पवार
२७. मा.आझम फकीरभाई पानसरे
२८. मा.भापकर मारुती साहेबराव
२९. मा.शेट्टी जगदिश
३०. मा.सौ. मंगलाताई अशोक कदम
३१. मा.बोबडे भिमा सखाराम
३२. मा.उबाळे सुलभा रामभाऊ
३३. मा.तानाजी विठ्ठल खाडे
३४. मा.सुमनताई मधुकर पवळे
३५. मा.कुमार आर. एस.
३६. मा.उल्हास शेट्टी
३७. मा.जावेद शेख
३८. मा.भालेराव ज्ञानेश्वर निवृत्ती
३९. मा.कुटे गोपाळ नाना
४०. मा.शरद उर्फ राजू मिसाळ
४१. मा.भोंडवे तुकाराम महादू
४२. मा.गणेश तुकाराम भोंडवे
४३. मा.साळुंके राजेंद्र गुलाबराव
४४. मा.वाघ रघुनाथ दलपत
४५. मा.सौ. आशा ज्ञानेश्वर सुर्यवंशी
४६. मा.भाऊसाहेब सोपानराव भोईर
४७. मा.तिकोने हरिभाऊ किसन
४८. मा.बाराहाते शरद भगवंतराव
४९. मा.अपर्णा निलेश डोके
५०. मा.गावडे जयश्री वसंत
५१. मा.साबळे जगन्नाथ दगडू
५२. मा.गुरुबक्ष किसनदास पहलानी
५३. मा.रामआधार धारिया
५४. मा.वाघेरे प्रभाकर नामदेव
५५. मा.विठ्ठल ऊर्फ नाना काटे
५६. मा.बाळासाहेब उर्फ खंडुशेठ दगडु कोकणे

५७. मा.तापकीर मच्छिंद्र भाऊसाहेब
५८. मा.भारती ज्योती सुखलाल
५९. मा.कोकणे संतोष अंकुश
६०. मा.दरेकर सतीश दगडू
६१. मा.आण्णा ऊर्फ मनोहर पवार
६२. मा.बारणे संतोष नागु
६३. मा.बारणे सिध्देश्वर बाळासाहेब
६४. मा.बारणे श्रीरंग चंदु ऊर्फ आप्पा
६५. मा.कलाटे कमल तानाजी
६६. मा.आदियाल (शीख) शोभा गुरुमितसिंग
६७. मा.सौ. नांदगुडे सुजाता विलास
६८. मा.अशोकभाई सोनवणे
६९. मा.जगताप शंकर पांडुरंग
७०. मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब
७१. मा.एकनाथ मोटे
७२. मा.सौ. गावडे सुषमा गोविंद
७३. मा.गायकवाड सुरदास तुकाराम
७४. मा.काटे राजेंद्र भिकनशेठ
७५. मा.नितीन ऊर्फ सनी रामचंद्र ओव्हाळ
७६. मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण
७७. मा.सुपे भाऊसाहेब रामभाऊ
७८. मा.डॉ.वैशालीताई घोडेकर
७९. मा.श्री.बाबर प्रकाश धरमसी
८०. मा. हनुमंत बाळासाहेब गावडे
८१. मा. उत्तम मुक्ताजी हिरवे
८२. मा. विनायक सुरेश रणसुभे
८३. मा. प्रेमकुमार शंकरन नायर ऊर्फ बाबू नायर
८४. मा. एकनाथ रावसाहेब पवार

याशिवाय मा.सावंत-सहा.आयुक्त, मा.धाडगे-मुख्यलेखा परिक्षक, मा.काळे-नगरसचिव, मा.लोंढे-मुख्य लेखापाल, मा.पाटील-उपसंचालक (नगररचना), मा.सुरगूडे-विकास अभियंता, मा.डॉ. अय्यर-वैद्यकीय संचालक,मा.जाधव,मा.दुधेकर-

कार्यकारी अभियंता,मा.माछरे-विशेष अधिकारी,मा.पवार-प्रशासन अधिकारी (अस्था), मा.गायकवाड-जनतासंपर्क अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-----------

मा.महापौर :- उपस्थित मा.नगरसेवक व नगरसेविका, आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

(डॉ.बाबासाहेब अंाबेडकर दलित मित्र पुरस्कार मिळालेले पंडित डॉ.नंदकिशोर कपोते यांचा विशेष कार्याबद्यल सत्कार करणेत आला.)

मा.महापालिका सभा क्र.४६ दि.२०/०४/२०१० व २१.४.२०१० (दु.१.०० व १.५०) चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

---------------------

(मा.दत्तात्रय साने, मा.अशोकभाई सोनावणे, मा.सुलभा उबाळे यांनी दि. २६ एप्रिल २०१० च्या करमाफी निर्णयाबाबत वक्तव्य केले त्या अनुषंगाने मा.महापौर यांनी शासनाकडे प्रस्ताव पाठविणेसंबंधात सुचीत केले )

मा.सुरदास गायकवाड :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक :- १

दिनांक :-२०.०५.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.आशा सुर्यवंशी, मा.जयश्री गावडे यांचा प्रस्ताव
२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.११००८ दि.२२.४.२०१०

संग्राम स्पोर्टस् क्लब यांस र.रु.२,००,०००/- अनुदान व पुणे जिल्हा हौशी सायकलींग संघटना यांस अनुदानाची अट शिथील करुन र.रु.१,००,०००/- अनुदान देणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.विनायक रणसुभे :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

मा.मंगलाताई कदम :- मा.महापौर साहेब, नवीन वर्षाचे बजेट सुरु झालेले आहे त्याप्रमाणे हे अनुदानाचे विषय यायला लागलेले आहेत. नक्कीच संग्राम स्पोर्टस क्लब आणि पुणे जिल्हा हौशी सायकलींग संघटना हे उत्कृष्ठ काम करतात. परंतु मागच्या वेळेस विषय मंजूर केलेला होता, तो वाकडचा मुलगा आहे त्यानी वर्तुळ हा नवीन मराठी लघुपट तयार केलेला आहे. कार्तिकी गायकवाड आणि हा एकत्रित विषय

ठेवला होता. कार्तिकी गायकवाडला एक लाख रुपये दिलेले आहेत आणि वाकडच्या मुलाला दिलेले नाहीत. हा मुलगा गरीब आहे चांगले प्रयत्न करतो आहे त्याला पुरस्कार मिळालेले आहेत. त्याचा विषय मंजुर केलेला आहे तो मराठी चित्रपटासाठी चांगले प्रयत्न करत आहे त्याला अनुदान मिळालेले नाही.

मा.महापौर साहेब, मी खालीलप्रमाणे उपसुचना मांडते- प्रविण मोहन मोकळ यांचेकरिता संमित्र युवक मंडळ यांस अटी शर्ती वगळुन र.रु.१,००,०००/- अनुदान देणेस मान्यता देणेत यावी.

मा.सुजाता नांदगुडे :- मा.महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन देते.

मा.महेश लांडगे :- मा.महापौर साहेब, प्रविण नेवाळे यांचा सुध्दा विषय केलेला होता त्यामध्ये आपण लक्ष घातलेतर बरे होईल.

मा.महापौर :- त्यावेळेला मी सांगीतले होते मंडळाच्या नावाने द्या.

मा.महेश लांडगे :- मा.महापौर साहेब, आम्ही ते केलेले आहे, चांगला खेळाडू आहे त्यांना सुध्दा द्यावे.

मा.महापौर :- भारताचे प्रतिनिधीत्व करतो म्हणून सर्व सभागृहाने मान्यता दिलेली होती. प्रशासनाने याची नोंद घ्यावी, त्यांना ताबडतोब चेक द्यावा.

मा.सुरदास गायकवाड :- मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक :- ८६५ विषय क्रमांक :- १
दिनांक :-२०.०५.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.आशा सुर्यवंशी, मा.जयश्री गावडे यांचा प्रस्ताव
२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.११००८ दि.२२.४.२०१०

संग्राम स्पोर्टस् क्लब यांस र.रु.२,००,०००/- अनुदान व पुणे जिल्हा हौशी सायकलींग संघटना यांस अनुदानाची अट शिथील करुन र.रु.१,००,०००/- अनुदान व प्रविण मोहन मोकळ यांचेकरिता संमित्र युवक मंडळ यांस अटी शर्ती वगळुन र.रु.१,००,०००/- अनुदान देणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल -७२ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

मा.सुरदास गायकवाड :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक :- ८६६ विषय क्रमांक :- २
दिनांक :-२०.०५.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.वैद्य/७/कावि/९४१/१० दि.२२/४/१०
२) मा.स्थायी समिती ठराव क्र. ११०५३ दि.४.५.२०१०

मनपाच्या सर्व रूग्णालये व दवाखान्यांमध्ये पीएमपीएमएल कर्मचारी (पुर्व पी.सी.एम.टी.) व त्यांचे कुटूबियांना मोफत वैद्यकीय सुविधा पुढील निर्णय होईपर्यंत देणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

मा.विनायक रणसुभे :- मा.महापौर साहेब, महापालिकेच्या दवाखान्यामध्ये सुविधा देणार का खाजगी दवाखान्यात सुध्दा सुविधा घेतल्यानंतर महापालिकेच्या वतीने खर्च देणार याचा खुलासा करावा.

मा.ए.एस.सावंत :- मा.महापौर साहेब, फक्त वायसीएम हॉस्पिटल आणि महापालिकेच्या दवाखान्यामध्ये औषधोपचारासाठी परवानगी मागितलेली आहे. रिएम्बर्समेंटसाठी यामध्ये संबंध येत नाही.

मा.महापौर :- पुर्वीचे पीसीएमटीचे व सध्या पीएमपीएमएल मध्ये असलेले जे कर्मचारी आहेत त्यांच्यासाठी आपल्या हद्दीमधील जे दवाखाने आहेत त्याठिकाणी औषधोपचार द्यावेत. पुणे महापालिकेनी सुध्दा त्यांच्या कर्मचा-यांसाठी तसे केलेले आहे.

मा.आर.एस.कुमार :- मा.महापौर साहेब, सकाळी पेपरमध्ये बातमी वाचली संत तुकारामनगर डेपो मधील गॅसवर चालणा-या ५० गाडया काढून त्याठिकाणी डबडा गाडया दिलेल्या आहेत हे खरे आहे का. नेहमी पीएमपीएमएल कडून पीसीएमसी ला

वेगळी ट्रिटमेंट दिली जाते. नवीन गाडया का काढल्या आणि जून्या गाडया का दिल्या.

मा.महापौर :- ती पेपरची बातमी आहे. मी पदसिध्द सदस्य आहे त्याची काळजी मी घेईल.

मा.महेश लांडगे :- मा.महापौर साहेब, विषय मंजूर करावा पीएमपीएमएलचे आपण स्वत:,आयुक्त व स्थायी समिती अध्यक्ष सभासद आहेत. आपल्या कामगारांना प्रमोशन देवून पुणे महापालिकेच्या हद्दीत बदली केलेली आहे. ज्या कर्मचा-यांची बदली केलेली आहे त्या कर्मचा-यांचा एक ते दिड वर्षे कालावधी राहिलेला आहे. त्यामध्ये काही कर्मचा-यांची प्रकृती ठिक नसते अशा कर्मचा-यांसाठी तेथील मिटिंगमध्ये आपण चर्चा केलीतर बरे होईल त्या लोकांना न्याय दिल्यासारखे होईल.

मा.यशवंत भोसले :- मा.महापौर साहेब, आपण आणि आयुक्त पीएमपीएमएलच्या कमिटिवर आहात. माझ्या वॉर्डामध्ये पीएमपीएमएलचा बसडेपो आहे. वास्तविक पाहता म्हाडाने ज्यासाठी ही जागा ठेवली ती बसटर्मिनससाठी होती आणि कुठल्याही प्रकारची मान्यता न घेता हा डेपो त्याठिकाणी झालेला आहे. बाजूला एक कि.मी.च्या अंतरावर दुसरा डेपो झालेला आहे. हा डेपो हालविण्यासाठी त्या जागेचे आरक्षण उठविले व त्याठिकाणी बगीचा करावा म्हणून मी पाठपुरावा एक वर्षापासुन करतो आहे. २००९ मध्ये ठराव झाला परंतु अद्यापपर्यंत तो डेपो हालला नाही. आपण त्या कमिटि मध्ये आहात व त्या वॉर्डातून यापुर्वी १५ वर्षे निवडून आलेला आहात. लोक सांगतात की यामुळे दम्याचे विकार, हार्टचे विकार झालेले आहेत, वृध्दाना त्रास होतो,मुलांना त्रास होतो. आयुक्तांनी सांगीतले होते की हा डेपो १५ दिवसात हालेल, नंतर पीएमपीएमएलने सांगीतले हा डेपो हालणार नाही. हि कशासाठी छळवणूक चालली आहे. ठराव होवूनही या सभागृहाचा मान राखला जात नसेलतर, जीआर येवून त्याची अंमलबजावणी होत नसेलतर काय उपयोग आहे. असे होणे म्हणजे महापौरांचा, आयुक्तांचा अवमान केल्यासारखे आहे. हा डेपो लवकरात लवकर हालवावा व याचे श्रेय आपण घ्यावे. हा डेपो हाललातर तुमचे मोठे कटआऊट मी लावेल. हा डेपो तूमच्या कालावधीमध्ये हालवावा.

मा.श्रीरंग बारणे :- मा.महापौर साहेब, आपण त्या समितीचे सदस्य आहात. बस खरेदीसाठी या महापालिकेनी JNNURM चे ३० कोटी ५० लाख मिळालेले तात्काळ त्यांना वर्ग केलेले आहेत. पुणे महापालिकेला सुध्दा निधी मिळालेला आहे परंतू त्यांनी तो निधी पीएमपीएमएल कडे वर्ग केलेला नाही. या शहरामध्ये पीएमपीएमएलच्या ज्या गाडया येतात त्या गाडयाचा दर्जा प्रामुख्याने चांगल्या प्रतीचा

नाही. गाडया नवीन खरेदी केल्या जातात व त्या पुणे शहरात वापरल्या जातात परंतु पिंपरी चिंचवड शहरात जुन्या गाडया येतात. पिंपरी चिंचवड शहरात एक सुध्दा थांबा नाही. पीएमपीएमएलच्या बैठकीला आपण गेल्यानंतर आमच्या शहराला दुजाभाव होऊ नये असे सांगावे. आपण केंद्रशासनाचा,राज्यशासनाचा निधी मिळाल्यानंतर लगेच वर्ग केला. या शहरातून गेलेले पैसे करदात्यांचे पैसे आहेत त्याचा विनीयोग आमच्या शहरातील नागरीकांना व्हावा याची आठवण त्या बैठकीमध्ये व्हावी. मा.अशोकभाई सोनवणे :- मा.महापौर साहेब, दोन वर्षापुर्वी आपल्या आरोग्य वैद्यकीय अधिका-यांनी आजी-माजी नगरसेवकांसाठी मेडीक्लेम पॉलीसी सांगीतलेली होती त्या योजनेचे पुढे काय झाले याचा खुलासा करावा.

मा.ज्ञानेश्वर भालेराव :- मा.महापौर साहेब, पीएमपीएमएलच्या कर्मचा-यांचा विषय आलेला आहे. हा विषय मंजूर करण्यास विरोध नाही. परंतु पीएमपीएमएलच्या दुटप्पीपणाच्या वागण्याबद्यल बोलले पाहिजे. ज्यावेळेला ही कंपनी स्थापन केली त्यावेळेला त्यांना दरमहा सव्वा कोटी आपण द्यायचे व ते सुरु केलेले आहे आणि पुणे महापालिकेनी फक्त साठ लाख द्यायचे तरी पिंपरी चिंचवडला कमी लेखले जाते. आज पेपरला आलेले आहे मोडक्या बस आपल्याकडे दिल्या आणि चांगल्या बस तीकडे नेल्या, हे बरोबर नाही. या पध्दतीने ते अधिकारी करत असतीलतर कार्यवाही केली पाहिजे. त्यांचे सर्व कर्मचारी अनुकंपावर घेतलेले आहेत परंतु पिंपरी चिंचवडचे फक्त २२ कर्मचारी घेतलेले आहेत आणखी ४६ कर्मचारी घ्यायचे राहिलेले आहेत. आपण त्यांना चांगल्याप्रकारे सुविधा देतो आणि आपल्यावर अन्याय होतो. महापौर साहेब, बंड साहेबांची पिंपरी चिंचवड महापालिके बरोबर मिटिंग घ्यावी.

मा.भाऊसाहेब भोईर :- मा.महापौर साहेब, जशी पाणीपुरवठया संदर्भात स्पेशल मिटिंग आयोजित केली होती त्याप्रमाणे पीएमपीएमएलच्या संदर्भात एक स्पेशल मिटिंग घ्यावी.

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, सर्व सन्मा.सदस्यांची पीएमपीएमएलच्या संदर्भात एक स्पेशल मिटिंग आयोजित करावी.

मा.महापौर :- पीएमपीएमएलच्या संदर्भात स्पेशल मिटिंग बोलवू त्याचप्रमाणे अधिका-यांना सुध्दा बोलावून घेऊ. संत तुकारामनगर हा एकच वॉर्ड नसुन महापौर या नात्याने सर्व ऐरियामध्ये काम बघतो. हा विषय अजेंडयावर आला त्याच अजेंडयावर पुणे महापालिकेनी अशाप्रकारचे आठ विषय आणलेले होते जागा हस्तांतरण करण्यासाठीचे त्यावेळेला तीकडच्या स्थायी समितीने आक्षेप घेतला होता त्यावर वाद झाला होता. गॅझेट झालेले आहे म्हणून,आम्ही त्याठिकाणी मांडले होते,

मॉडीफिकेशन होऊन आलेले आहे असे सांगीतले होते. त्यावेळेला त्यांनी सांगीतले ते आठ विषय आणि हा विषय परत पाठवावा त्यावर निर्णय झालेला नाही म्हणून स्पेशल मिटिंग आपण सर्व मुद्यांसाठी बोलवू.

मा.यशवंत भोसले :- मा.महापौर साहेब, त्याठिकाणची ही जागा पीएमपीएमएलची नाही. ती जागा हौसींग बोर्डाची आहे. ती फक्त बस वळवण्यासाठी महापालिकेला दिलेली आहे. ही जागा त्यांच्या मालकीची नाही तर नागरीकांची आहे. त्यांची असेलतर त्यांनी घ्यावी.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल -७२ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

मा.विनायक रणसुभे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ३ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक :- ८६७ विषय क्रमांक :- ३
दिनांक :-२०.०५.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.भूजिं/२/कावि/१००/१० दि.२७/४/१०
२) मा.स्थायी समिती ठराव क्र. ११०६९ दि.४.५.२०१०

से.नं.२४, संत तुकाराम महाराज व्यापारी संकुल मधील रिक्त ५ गाळे २५ वर्षाच्या भाडेपट्टाने (लिज) देणेकामी प्राप्त निविदा मधील सर्वोच्च दराच्या १)एन आय बी आर संस्था ( गाळा क्र : बी - १ ला म - ४ क्षेत्र ३९.५६ चौ.मी. र.रु.१४,५०,०००/-) २) एन आय बी आर संस्था (गाळा क्र : बी - १ ला म - ६ क्षेत्र ३१.०६ चौ.मी.र.रु.१०,५०,०००/- ) ३) श्रीम.शर्मिला बाबर (गाळा क्र.सी - तळ म - १६ क्षेत्र २१:०० चौ.मी.र.रु.१०,६६,०००/-) ४) श्रीम विजया सोनवणे (गाळा क्र: सी - तळ म - १७ क्षेत्र २१.०० चौ.मी.र.रु. ९,००,०००/- ) ५)श्री.राजेंद्र बाबर(गाळा क्र.डी - तळ - १० क्षेत्र २१:०० चौ.मी.र.रु.१०,६६,०००/- या निविदा धारकांना प्रस्तावित केलेप्रमाणे गाळे २५ वर्षाच्या लिजने निविदा अटी शर्तीनुसार देणेस मा.आयुक्त यांचे प्रस्तावाप्रमाणे मान्यता देणेत येत आहे. से.नं.२४ श्री.संत तुकाराम महाराज व्यापारी संकुल निगडी येथील उपहारगृहासाठी निविदा प्रसिध्द केली होती. उपहारगृह ब्लॉक सी दुसरा मजल्यासाठी सौ.सुप्रिया शेट्टी यांनी निविदा भरली आहे मनपाची २५ वर्षा

साठी लिज किंमत र.रू.४,१२,३००/- इतकी आहे सौ.सुप्रिया शेट्टी यांनी सदर गाळ्यासाठी र.रू.४,९०,०००/- देऊ केली आहे ही रक्कम मनपाच्या लिज रकमेपेक्षा जास्त असल्याने से.नं.२४ श्री.संत तुकाराम महाराज व्यापारी संकुल निगडी येथील उपहारगृह ब्लॉक सी दुसरा मजल्यासाठी सौ.सुप्रिया शेट्टी यांना २५ वर्षासाठी लिजने (भाडेपट्टा करार) देण्यास मान्यता देणेत येत आहे.

मा.उत्तम हिरवे :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

मा.जावेद शेख :- मा.महापौर साहेब, निगडी से.नं.२४ मध्ये संत तुकाराम महाराज व्यापारी संकुलात एकूण चार गाळे आहेत आणि त्याला लागून असलेला गाळा मागितलेला आहे. या सभागृहामध्ये भारत देशाचे संविधान लावलेले आहे त्याचे आपण पालन करतो का. संत तुकाराम महाराज व्यापारी संकुल याच्याशी निगडीत आहे. मुं.प्रां.अधिनियम १९४९ चे कलम १० मधील पोटकलम मी वाचून दाखवितो. (कलमाचे वाचन केले) मा.महापौर साहेब, जगदीश शेट्टी हे नगरसेवक आहेत. १९९९ सालामध्ये या उपहारगृहाची निवीदा काढली होती, मी मागच्या वर्षी माहितीच्या अधिकारामध्ये माहिती मागितली त्यावेळेला तत्कालीन अति.आयुक्त यांच्या बरोबर बसुन संपुर्ण फाईलचे प्रोसीजर कसे झाले, नियमांचा भंग कसा झाला हे पाहिलेले आहे. याबद्यल मी २५ मार्चला आयुक्तांना तक्रार दिलेली आहे. ३० मार्चला मी आयुक्तांना पुन्हा पत्र दिलेले आहे. आज १४ महिने होऊन गेलेले आहेत तरी कोणीही लक्ष दिलेले नाही. त्या इमारतीची पाचवेळा निवीदा निघालेली आहे व फक्त एका परिवाराशिवाय कोणीही निवीदा भरु शकत नाही. व्यापारी संकुलनाला प्राधिकरणाने जेव्हा परमिशन दिले तेव्हा त्या उपहारगृहाच्या पाय-या बाहेरुन होत्या त्या पाय-या नंतर आतमधुन केलेल्या आहेत त्यामुळे कोणीही व्यक्ति त्या इमारतीमध्ये एण्ट्री करु शकत नाही. त्याठिकाणी दहा वर्षापासून दुसरा मजला चालू आहे. नगरसेवक पदाचा गैरवापर आहे. जगदीश शेट्टी यांच्या नावावर करारनामा करण्यात आल्याचे पत्र दिलेले आहे. से. २४ मध्ये मातोश्रीच्या नावाने करारनामा न करता पहिल्या मजल्याचा ताबा आहे, ज्याचा रेंट १९०००/- आहे तरी यावर ॲक्शन घेतली पाहिजे. प्राधिकरणाने प्लॅन पास केला त्याची माहिती मी मागीतलेली होती त्यावेळेला समजले याच्या पाय-या बाहेरुन आहेत परंतु त्यांनी नंतर त्या आतमधुन कशा काय केल्या. प्राधिकरणाने सांगीतले आहे की प्लॅन पास व्यतिरिक्त एकही परवानगी कोणालाही बदल करण्यास देण्यात आलेली नाही. जगदीश शेट्टी नगरसेवक आहेत त्यांना समजायला पाहिजे आपण पालिकेच्या मालमत्तेचा कसा वापर केला पाहिजे. त्यावेळेस त्यांनी महापालिकेच्या कोषागारामध्ये पैसे न भरता तेथील बिल्डींगचा ताबा घेतल्यामुळे दि. १२.६.२००० रोजी त्यांच्या मातोश्रीना कारणे दाखवा नोटिस बजावलेली होती परंतु कार्यवाही करण्यात आलेली नाही. दि. २५.८.२००० रोजी

त्यावेळेसच्या आयुक्तांनी आदेश काढला आणि गाळा जप्त केला, त्यानंतर तत्कालीन आयुक्तांनी विशेष प्रस्ताव केला. त्याठिकाणी त्यांना कर्ज काढण्यासाठी पालीकेनी ना-हरकत दाखला दिलेला आहे तो आपल्या कायदयामध्ये बसत नाही. त्यांना कोणत्या कायद्याने हा ना-हरकत दाखला दिलेला आहे. त्यांची अनामत रक्कम आणि हा गाळा रद्द केलेला होता. शिंदे ॲण्ड शिंदे कंपनीला सुध्दा पैसे भरण्यासाठी उशिर केला म्हणून ना हरकत दाखला दिलेला नाही मग यांना कसा काय दिला. हा विषय स्थायी समितीमध्ये यायला पाहिजे होता तो आलेला नाही. आतमध्ये झालेल्या बांधकामाचे फोटो काढून मी आयुक्तांना दिलेले आहेत. कलम १० नुसार कार्यवाही व्हायला पाहिजे होती. लेखी तक्रार करुन सुध्दा कार्यवाही होत नाही. या उदंड कारभारावर काय होणार आहे. मारुती भापकर यांनी शहराच्या नागरीकांसाठी उपोषण केले त्याबद्दल पालिकेनी चांगला निर्णय घेतलेला आहे. सावली हॉटेलमध्ये फुकट पाणी वापरतात व इकडे नागरीकांकडून वसुली करतात. एक जबाबदार नगरसदस्य असे करतात तरी आपण काय करणार आहात. या व्यापारी संकुलामधील एक मजला त्यांच्या नावावर आहे. निवडणूक आयोगाला सुध्दा खोटी माहिती दिलेली आहे. भूमि आणि जिंदगीचे जे अधिकारी असतील त्यांना बोलवावे आणि त्यांना सांगू द्यावे की त्यांच्यावर काय कार्यवाही केली एक वर्षे झाले तक्रार दिलेली आहे त्यावर काय कार्यवाही केलेली आहे, काय ॲक्शन होणार आहे. यासंदर्भातील याचीका स्टॅम्प नं.१२६५३ उच्च न्यायालयामध्ये दाखल केलेली आहे. उच्च न्यायालयामध्ये याचीका दाखल केल्यानंतर हा विषय घ्यायला नाही पाहिजे. मी आपल्याला पुराव्यानिशी कागदपत्र दिलेले आहेत. जगदीश शेट्टी यांच्या नावावर जागा आहे,ताबा पावती आहे २००८ साली त्यांनी पैसे भरलेले आहेत. त्यांचे पद रद्द करावे खुलासा करावा.

मा.महापौर :- आपण प्रश्न उपस्थित केलेला आहे त्याबद्दल कायद्यातील शेवटची ओळ आपण वाचली तर आपले समाधान होईल. लीगल ओपीनियन घेतलेले आहे. विषय आयुक्तांमार्फत आलेला आहे. रितसर निवीदा काढलेली आहे. विषय सभागृहासमोर आलेला आहे,लिगल ओपीनियन घेतलेले आहे व विषय मंजूरीसाठी आपल्यासमोर आहे. यानंतर सुध्दा न्यायालयात जाण्याची अनुमती आहे.

मा.जावेद शेख :- मा.महापौर साहेब, याच्यामध्ये पहिला मजला त्यांच्या नावावर आहे आणि त्यांनी आतमध्ये अनाधिकृतपणे बांधकाम केलेले आहे ते अधिकृत आहे का हे सांगावे.

मा.महापौर :- हा विषय रितसर करावा,लिगली करावा. हा विषय सभागृहासमोर आहे सभागृहाने यावर निर्णय घ्यावा. बेकायदेशिर होत असेलतर ते ताबडतोब थांबले जावे. त्याठिकाणी जे बेकायदेशिर असेल ते थंाबवावे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल -७२ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ४ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक :- ४

दिनांक :-२०.०५.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.सशअ/५५१/१० दि.४/५/१०
२) मा.स्थायी समिती ठराव क्र. ११०७८ दि.४.५.२०१०

मा.महापौर यांनी दि.२२ एप्रिल, २०१० रोजी आयोजित केलेल्या बैठकीमध्ये झोपडपट्टीतील ग्राहकांसाठी प्रति वर्षी र.रू.१,०७०/- ऐवजी प्रतिवर्षी र.रू.७००/- याप्रमाणे पाणीपट्टी आकारण्याचे जाहीर केलेनुसार सन २०१०-११ या वर्षात झोपडपट्टीतील ग्राहकांसाठी (मीटर न बसविलेल्या) प्रति वर्षी र.रू.१,०७०/- ऐवजी प्रतिवर्षी र.रू.७००/- याप्रमाणे पाणीपट्टी आकारण्यास मान्यता देणेत येत आहे.

मा.काळूराम पवार :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

मा.उल्हास शेट्टी :- मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो-दिनांक ३१/०३/२००९ अखेर मीटर न बसविलेल्या नळकनेक्शन ग्राहकांना आकारण्यात आलेला रु.१४०४/- दंड माफ करण्यात यावा. दिनांक ३१/०३/२००९ पूर्वीचे नळकनेक्शन असणारे जे ग्राहक थकबाकीसह सन २००९-१० या वर्षाची पाणीपट्टी रु.१४०४/- नुसार दिनांक ३१/०७/२०१० पूर्वी भरुन मीटर बसविण्याकामी अर्ज करतील अशा ग्राहकांना मोफत मीटर देण्यात यावेत. दिलेल्या मुदतीत म्हणजेच दिनांक ३१/०७/२०१० पर्यंत मागिल थकीत पाणीपट्टी भरुन, मीटर बसवून न घेणाऱ्या ग्राहकांना दुप्पट दराने पाणीपट्टी आकारण्यात यावी व अशा ग्राहकाने स्वत: नविन मीटरची संपूर्ण रक्कम अदा केल्यानंतरच त्यांना मीटर देण्यात यावेत. ज्या ग्राहकांनी दंडासह २८०८/- नुसार पाणीपट्टी भरलेली आहे, त्यांच्या दंडाची र.रु.१४०४/- सन २०१०-११ च्या बिलामध्ये समायोजित करण्यात यावी. त्याचबरोबर चाळीतील ग्राहकांच्या बाबतीत, चाळमालकाची संमती असणाऱ्या भाडेकरुला रु.१५००/- मध्ये तर चाळमालकाची संमती नसणाऱ्या भाडेकरुकडून रु.१५००/- अधिक एक वर्षाची आगाऊ पाणीपट्टी घेऊन नळकनेक्शन देण्यास मान्यता देणेत यावी.

मा.राजू मिसाळ :- मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देतो.

मा.महापौर :- ज्या जाचक अटि होत्या, ज्या गोष्टी कमिट केलेल्या होत्या त्या सर्व उपसूचनेमध्ये आलेल्या आहेत.

मा.गणेश भोंडवे :- मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये ताथवडे ग्रामपंचायतीचे क्षेत्राचा दि.५/८/२००९ रोजी समावेश झालेला आहे. सध्या ग्रामपंचायतीचे पाणीपुरवठा योजनेमधून ग्राहकांना पाणीपुरवठा होत आहे. त्यांना दिल्या जाणाऱ्या पाणीपट्टीचा दर मनपा दरानुसार आकारणी न करता पुर्वीचे दरानुसार म्हणजेच वार्षिक र.रु.६००/- निवासी व र.रु.१२००/- बिगरनिवासी याप्रमाणे तसेच हद्दीलगतचे महानगरपालिका पाणीपुरवठा होत असलेल्या निवासी व बिगर निवासी ग्राहकांना महानगरपालिका दरानुसार पाणीपट्टी आकारणी करणेस, महानगरपालिका दराने आकारण्यात आलेली पाणीबिले सन ०९-१० पुढे चार वर्ष पर्यंत ग्रामपंचायतीप्रमाणे आकारण्यास मान्यता देणेत यावी.

मा.भाऊसाहेब सुपे :- मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देतो.

मा.रामअधार धारिया :- मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो-
मिलिंदनगर पुनर्वसन टप्पा क्र.१ मध्ये २००५ साली ज्या नागरिकांचे पुनर्वसन झाले आहे त्या नागरिकांना २००५ सालापासून दरवर्षी ७००/- (सातशे रुपये) प्रमाणे पाणीपट्टी आकारण्यास व भविष्यात ज्या झोपडपट्टी धारकांचे पुनर्वसन होणार आहे त्यांना सुद्धा दरवर्षी ७००/- रुपये प्रमाणेच पाणीपट्टी आकारण्यास मान्यता देणेत यावी.

मा.संतोष लोंढे :- मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देतो.

मा.श्रीरंग बारणे :- मा.महापौर साहेब, ताथवडे गावामध्ये महापालिकेची पाणीव्यवस्था आहे का ? आपली लाईन टाकलेली आहे का ? आपण महापालिकेच्या दराप्रमाणे बीले दिलेली आहेत. आपण त्यांना कुठलीच सुविधा देत नाहीत. महापालिकेच्या वतीने कोणत्याही प्रकारची पाणी वाटपाची सुविधा त्या गावाला दिलेली नाही परंतु बील आकारलेले आहे ते १२००/-,९००/- याप्रमाणे आहे. ग्रामपंचायतीला ज्यापध्दतीने पाणी बील होते त्या पध्दतीने महापालिका जोपर्यंत पाणी व्यवस्था करत नाही तोपर्यंत तशाच पध्दतीने दर ठेवावेत.

मा.मारुती भापकर :- मा.महापौर साहेब, हा जो पाण्याचा विषय आहे तो जनतेच्या अत्यंत जिव्हाळयाचा विषय आहे त्या संदर्भात,जनहिताच्या मागणीच्या संदर्भात आम्ही काही कार्यकर्त्यांनी अंदोलन करण्याची भूमिका घेतली. अंदोलनाच्या संदर्भात राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष,सभागृहातील ज्येष्ठ नेते आझमभाई पानसरे यांनी अंदोलनस्थळी येवून अंदोलकाचे मनोगत ऐकून घेतले. झोपडपट्टीमधील पाणीपट्टी किंवा चाळीमधील लोकांचे कनेक्शन देण्याचा विषय असेल,मोफत मिटरचा विषय असेल या मागण्या होत्या. जनहिताचा विषय घेवून त्याठिकाणी आम्ही अंदोलन करत होतो. आमचे एकूण १४ मुद्दे होते, १४ मुद्दे मान्य होतील अशी भूमिका आमची नव्हती. जनतेला महागाईच्या काळात जास्तीत जास्त दिलासा देण्याचा निर्णय घ्यावा अशाप्रकारची भूमिका घेवून अंदोलन करत होतो. त्यामध्ये महापौर आपले मी अभिनंदन करेल, आपण अतीशय महत्वाची भूमिका घेतली आहे. मा.आयुक्तां समवेत बैठक लावून त्याठिकाणी आझमभाई पानसरे होते त्यांनी ठामपणे सांगीतले या अंदोलनातील १४ मुद्दे मान्य करता येणार नाहीत परंतु सामान्य नागरीकांना त्रासदायक आहेत असे चार-पाच मुद्दे मान्य केले पाहिजेत. त्यांच्या आग्रहाखातर, महापौरांच्या आग्रहाखातर आयुक्तांना आणि प्रशासनाला जनहिताचा निर्णय घेणे भाग पडले. प्रशासन अशाप्रकारचा निर्णय घेईल असे वाटत नव्हते परंतु महापौरांच्या, आझमभाई पानसरे यांच्या आग्रहामुळे निर्णय झालेला आहे आणि म्हणून सभागृह हे सर्वोच्च आहे, सभागृहातील नेते आहेत त्यांचा निर्णय अंतिम असतो अशाप्रकारचा संदेश यामधुन जातो. आझमभाई पानसरे, योगेश बहल, जगदीश शेट्टी, उल्हास शेट्टी रामअधार धारिया ,कुमार साहेब,सुलभाताई उबाळे,श्रीरंग बारणे,भाऊसाहेब भोईर, सोनकांबळे ताई व इतर सर्व सभासद असतील त्यांनी या विषयाला मंजूरी दिलेली आहे त्यामुळे संपुर्ण श्रेय सभागृहाचे आहे, आझमभाई पानसरे आणि महापौरांचे मनापासून आभार मानतो. सर्व सभासदांनी सहकार्य केलेले आहे दिलेला शब्द पाळणारा माणुस अशाप्रकारची आझमभाई पानसरे यांची ख्याती आहे. आपणा सर्वांना आझमभाई पानसरे यांना आणि महापौरांना मनापासून धन्यवाद देतो.

मा.अे.अेस.सावंत :- मा.महापौर साहेब, श्रीरंग बारणे यांनी मुद्दा मांडलेला आहे त्याची दखल घेतलेली आहे. महापालिकेनी पाण्याचे कनेक्शन देवून पाणीपुरवठा केला असेल आणि बील दिले असेलतर ठिक आहे परंतु पाणीच दिले नाही आणि बील दिले असेलतर निश्चित व्हेरीफिकेशन करण्यासाठी सांगतो.

मा.श्रीरंग बारणे :- मा.महापौर साहेब, ग्रामीण भागाला करामध्ये सवलत दिलेली होती या भागाला नागरी सुविधा दिलेल्या नाहीत. ग्रामपंचायतीची योजना आहे ती ६००/- रुपये दराने पाणीपट्टी आकारते. जोपर्यंत महापालिका पाण्याची व्यवस्था करत नाही तोपर्यंत ग्रामपंचायतीचा दर लागू ठेवावा.

मा.महापौर :-  ठराव केलेला आहे.

मा.श्रीरंग बारणे :-  मा.महापौर साहेब, ज्यांना वाढीव दराने पाणीबील दिलेले आहेत ते रद्य करुन द्यावे.

मा.यशवंत भोसले :- मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो-नव्याने बसविण्यात आलेले पाणीमिटर चुकीच्या पद्धतीने फिरत आहे व ज्या ग्राहकांना अवाजवी बिले दिली जाणारी नादुरुस्त मिटर बसविलेपासुन १ वर्षाच्या कालावधीपर्यंत मोफत दुरुस्ती ग्राहकांना करुन देणेस मान्यता देणेत यावी.

मा.सतीष दरेकर  :- मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देतो.

मा.महापौर :-  मीटर खराब असेलतर १०० टक्के रिप्लेसमेंट करुन मिळणार आहे ती महापालिकेची जबाबदारी आहे.  परंतू तपासणी फी २००/- रुपये भरावी लागेल.

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, मा.यशवंत भोसले व मा.सतीष दरेकर यांची, मा.रामअधारधारिया व मा.संतोष लोंढे यांची, मा.गणेश भोंडवे व मा.भाऊसाहेब सुपे यांची, मा.उल्हास शेट्टी व मा.राजू मिसाळ यांची उपसूचना स्विकारली आहे.

मा.आझमभाई पानसरे :- मा.महापौर साहेब, आपण फक्त ठराव करतो.  आता संागण्यात आले की ताथवडे गावामध्ये ग्रामपंचायत ज्या पध्दतीने पाणीपुरवठा करते त्यावेळेसचा दर आजही ठेवण्यात यावा. परंतु ज्यावेळेला पिंपरी चिंचवड महापालिकेमध्ये नवीन गावे येतात ती आल्यानंतर त्या परिसरामध्ये महापालिकेच्या वतीने खर्च केला जातो, रस्ते व इतर कामांसाठी खर्च केला जातो याबाबतीतही विचार केला पाहिजे. ज्या मुलभूत सुविधा आहेत त्या आपण देवू शकतो. रस्ते,अंडरग्राऊंड ड्रेनेज किंवा भविष्यात होणारे काम त्याठिकाणी होणार आहेत. अधिका-यांना माहिती असेल त्यांनी सांगीतले पाहिजे ताथवडे गावामध्ये महापालिकेच्या वतीने काही खर्च झाला का. त्याची माहिती द्यावी. महापालिका करोडो रुपये खर्च करते. च-होलीचा ज्यावेळेला पिंपरी चिंचवडमध्ये समावेश करण्यात आला त्यावेळेला सगळयात जास्त खर्च ग्रामीण भागामध्ये झालेला आहे. ज्यावेळेला हे गाव पिंपरी चिंचवड महापालिकेमध्ये आले त्यावेळेला मुलभूत खर्च त्याठिकाणी दिलेला आहे.  जास्तीत जास्त खर्च ग्रामीण भागामध्ये झालेला आहे. गावात सुध्दा महापालिकेच्या वतीने कामे करावी लागतील. मुलभूत सुविधा देणे

महापालिकेचे कर्तव्य आहे. पाणीपुरवठयासाठी काही केलेले नाही आणि पाण्याचा खर्च केलेला असेलतर पुर्वीचा दर घेणे योग्य आहे का याचा सुध्दा सभागृहाने विचार करावा. आपल्या हातून चुक होऊ नये,महापालिचे नुकसान होऊ नये यासाठी लक्ष दिले पाहिजे.

मा.चंद्रकांता सोनकांबळे :- मा.महापौर साहेब, आझमभाई पानसरे आणि आपण सर्वानी प्रयत्न केले आहेत मी अभिनंदन करते. जीबी मध्ये पाणीपुरवठयाचा विषय झाला त्यावेळेला हेच सांगत होते झोपडपट्टीला किमान दराने पाणीपट्टी आकारली पाहिजे. पुणे महापालिकेचे दर बघुन त्याप्रमाणे आकारावेत असे सांगत होतो त्यावेळेस कोणीही ऐकण्याच्या मनस्थितीमध्ये नव्हते. उपोषण झाल्यानंतर मंजूर करायचे असे काही असते का. त्याच दिवशी दहा मिनिटात हे काम झाले असते त्यासाठी उपोषण करावे लागले व ते तुम्हांला सोडावे लागले. चांगला ठराव याठिकाणी मंजूर झालेला आहे. उपसूचना चांगली घेतली आहे त्याबद्यल राष्ट्रवादी पक्षाचे, सभागृहाचे आभार मानते.

यानंतर उपसूचनांप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक :- ८६८ विषय क्रमांक :- ४

दिनांक :-२०.०५.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.सशअ/५५१/१० दि.४/५/१०
२) मा.स्थायी समिती ठराव क्र. ११०७८ दि.४.५.२०१०

मा.महापौर यांनी दि.२२ एप्रिल, २०१० रोजी आयोजित केलेल्या बैठकीमध्ये झोपडपट्टीतील ग्राहकांसाठी प्रति वर्षी र.रू.१,०७०/- ऐवजी प्रतिवर्षी र.रू.७००/- याप्रमाणे पाणीपट्टी आकारण्याचे जाहीर केलेनुसार सन २०१०-११ या वर्षात झ ोपडपट्टीतील ग्राहकांसाठी (मीटर न बसविलेल्या) प्रति वर्षी र.रू.१,०७०/- ऐवजी प्रतिवर्षी र.रू.७००/- याप्रमाणे पाणीपट्टी आकारण्यास मान्यता देणेत येत आहे. दिनांक ३१/०३/२००९ अखेर मीटर न बसविलेल्या नळकनेक्शन ग्राहकांना आकारण्यात आलेला रु.१४०४/- दंड माफ करण्यात यावा. दिनांक ३१/०३/२००९ पूर्वीचे नळकनेक्शन असणारे जे ग्राहक थकबाकीसह सन २००९-१० या वर्षाची पाणीपट्टी रु.१४०४/- नुसार दिनांक ३१/०७/२०१० पूर्वी भरुन मीटर बसविण्याकामी अर्ज करतील अशा ग्राहकांना मोफत मीटर देण्यात यावेत. दिलेल्या मुदतीत म्हणजेच दिनांक ३१/०७/२०१० पर्यंत मागिल थकीत पाणीपट्टी भरुन, मीटर बसवून न घेणाऱ्या ग्राहकांना दुप्पट दराने पाणीपट्टी आकारण्यात यावी व अशा ग्राहकाने स्वत: नविन मीटरची संपूर्ण रक्कम अदा केल्यानंतरच त्यांना मीटर देण्यात यावेत. ज्या ग्राहकांनी

दंडासह २८०८/- नुसार पाणीपट्टी भरलेली आहे, त्यांच्या दंडाची र.रु.१४०४/- सन २०१०-११ च्या बिलामध्ये समायोजित करण्यात यावी. त्याचबरोबर चाळीतील ग्राहकांच्या बाबतीत, चाळमालकाची संमती असणाऱ्या भाडेकरुला रु.१५००/- मध्ये तर चाळमालकाची संमती नसणाऱ्या भाडेकरुकडून रु.१५००/- अधिक एक वर्षाची आगाऊ पाणीपट्टी घेऊन नळकनेक्शन देण्यास मान्यता देणेत येत आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये ताथवडे ग्रामपंचायतीचे क्षेत्राचा दि.५/८/२००९ रोजी समावेश झालेला आहे. सध्या ग्रामपंचायतीचे पाणीपुरवठा योजनेमधून ग्राहकांना पाणीपुरवठा होत आहे. त्यांना दिल्या जाणाऱ्या पाणीपट्टीचा दर मनपा दरानुसार आकारणी न करता पुर्वीचे दरानुसार म्हणजेच वार्षिक र.रु.६००/- निवासी व र.रु.१२००/- बिगरनिवासी याप्रमाणे तसेच हद्दीलगतचे महानगरपालिका पाणीपुरवठा होत असलेल्या निवासी व बिगर निवासी ग्राहकांना महानगरपालिका दरानुसार पाणीपट्टी आकारणी करणेस, महानगरपालिका दराने आकारण्यात आलेली पाणीबिले सन ०९-१० पुढे चार वर्ष पर्यंत ग्रामपंचायतीप्रमाणे आकारण्यास मान्यता देणेत येत आहे. मिलिंदनगर पुनर्वसन टप्पा क्र.१ मध्ये २००५ साली ज्या नागरिकांचे पुनर्वसन झाले आहे त्या नागरिकांना २००५ सालापासून दरवर्षी ७००/- (सातशे रुपये) प्रमाणे पाणीपट्टी आकारण्यास व भविष्यात ज्या झ ोपडपट्टी धारकांचे पुनर्वसन होणार आहे त्यांना सुद्धा दरवर्षी ७००/- रुपये प्रमाणेच पाणीपट्टी आकारण्यास मान्यता देणेत येत आहे. नव्याने बसविण्यात आलेले पाणीमिटर चुकीच्या पद्धतीने फिरत आहे व ज्या ग्राहकांना अवाजवी बिले दिली जाणारी नादुरुस्त मिटर बसविलेपासुन १ वर्षाच्या कालावधीपर्यंत मोफत दुरुस्ती ग्राहकांना करुन देणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल- ७२ प्रतिकूल -०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

मा.विनायक रणसुभे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ५ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक :- ५

दिनांक :-२०.०५.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.प्रभाकर वाघेरे, मा.आशा सुर्यवंशी यांचा प्रस्ताव...
२) मा.स्थायी समिती ठराव क्र. ११०८३ दि.४.५.२०१०

नेपाळ कराटे असोसिएशन च्या वतीने दि.९ ते १५ मे २०१० रोजी आंतरराष्ट्रीय कराटे कॅम्प काठमांडू, नेपाळ येथे आयोजित करण्यात आला असून

पिंपरी चिंचवड कराटे असोसिएशनच्या सात कराटे पट्टूंस आमंत्रित करण्यात आले असल्याने सदरच्या स्पर्धेस उपस्थित रहाणेकामी पिंपरी चिंचवड कराटे असोसिएशनच्या नांवे र.रू.८०,०००/- अनुदान अनुदानाच्या अटी शिथील करून देणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

मा.काळुराम पवार :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ५ दप्तरी दाखल करणेत यावा अशी सूचना मी मांडतो.

मा.उल्हास शेट्टी :- मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक :- ८६९ विषय क्रमांक :- ५
दिनांक :-२०.०५.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.प्रभाकर वाघेरे, मा.आशा सुर्यवंशी यांचा प्रस्ताव...
२) मा.स्थायी समिती ठराव क्र. ११०८३ दि.४.५.२०१०

विषय क्रमांक ५ दप्तरी दाखल करणेत येत आहे.

अनुकूल- ७२ प्रतिकूल -०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ६ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक :- ६
दिनांक :-२०.०५.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.जितेंद्र ननावरे, मा.रामदास कुंभार यांचा प्रस्ताव...
२) मा.स्थायी समिती ठराव क्र. ११०९३ दि.४.५.२०१०

सन २०१०-११ चे अंदाजपत्रका तील पुस्तक क्र.३ मधील पान क्र.२६२ ब)भाजी मार्केट प्रभाग अ.क्र.१ प्रभाग क्र.९२ सांगवी येथील भाजी मंडई इमारतीची स्थापत्य

विषयक दुरुस्तीची कामे करणे याकामावर तरतूद केलेली नसल्याने सदर कामाचे दुरुस्तीसाठी र.रू.१,००,०००/- तरतूद करणेसाठी अंदाजपत्रक पुस्तक क्र.२ संगणक विभाग पान क्र.१०० व १०१ वरील अ.क्र.४ संगणक दुरुस्ती व देखभाल या लेखाशिर्षावरील तरतूद र.रू.३० लाख मधून र.रू.१,००,०००/- वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.विनायक रणसुभे :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

मा.राजू मिसाळ :- मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- स्थापत्य विभागाकडील सन १०-११ चे अंदाजपत्रकातील भांडवली खर्चाच्या कामांवरील तरतुदीमध्ये वाढ/घट सोबतच्या प्रपत्र अ प्रमाणे करणेस तसेच सन २०१०-११ चे अंदाजपत्रकात सोबतच्या प्रपत्र ब मधील कामांसाठी तरतुद कमी असल्याने प्रपत्र ब प्रमाणे तरतुद वर्ग करणेस मान्यता देणेत यावी.

मा.गणेश भोंडवे :- मा.महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन देतो.

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक :-८७० विषय क्रमांक :- ६

दिनांक :-२०.०५.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.जितेंद्र ननावरे, मा.रामदास कुंभार यांचा प्रस्ताव...

२) मा.स्थायी समिती ठराव क्र. ११०९३ दि.४.५.२०१०

सन २०१०-११ चे अंदाजपत्रकातील पुस्तक क्र.३ मधील पान क्र.२६२ ब)भाजी मार्केट प्रभाग अ.क्र.१ प्रभाग क्र.९२ सांगवी येथील भाजी मंडई इमारतीची स्थापत्य विषयक दुरुस्तीची कामे करणे याकामावर तरतूद केलेली नसल्याने सदर कामाचे दुरुस्तीसाठी र.रू.१,००,०००/- तरतूद करणेसाठी अंदाजपत्रक पुस्तक क्र.२ संगणक विभाग पान क्र.१०० व १०१ वरील अ.क्र.४ संगणक दुरुस्ती व देखभाल या लेखाशिर्षावरील तरतूद र.रू.३० लाख मधून र.रू.१,००,०००/- वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे. स्थापत्य विभागाकडील सन १०-११ चे अंदाजपत्रकातील भांडवली खर्चाच्या कामांवरील तरतुदीमध्ये वाढ/घट सोबतच्या प्रपत्र अ प्रमाणे करणेस तसेच सन २०१०-११ चे अंदाजपत्रकात सोबतच्या प्रपत्र ब मधील कामांसाठी तरतुद कमी असल्याने प्रपत्र ब प्रमाणे तरतुद वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल- ७२ प्रतिकूल -०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

मा.विनायक रणसुभे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ७ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक :- ७

दिनांक :-२०.०५.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.नरवि/कावि/वि.नि. नि./०८/२०१० दि.०४/०२/२०१०

२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.२६० दिनांक ५.२.२०१०

३) मा. महापालिका सभा ठ.क्र.८४९ दिनांक २१.४.२०१० अन्वये

मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमध्ये आरक्षित जागेच्या सभोवताली असलेल्या वापराचे वर्गीकरण विचारात घेऊन विकास हक्क हस्तांतरणासाठी (टि.डी.आर.)अनुज्ञेय करावयाचा चटई क्षेत्र निर्देशांक किती असावा हे प्रस्तावासोबतच्या तक्त्यात नमूद करण्यात आलेले असुन त्यानुसार म.प्रा.व न.रा.अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) नुसार मंजुर विकास नियंत्रण नियमावलीमध्ये नियम क्र. N.2.4.5 मध्ये बदल करणेसाठी/तरतुदी नव्याने समाविष्ट करणेसाठी पुढील प्रमाणे फेरबदल प्रस्तावीत करण्यात आला असुन- " N.2.4.5- The builtup area for the purpose of F.S.I. credit in the DRC shall be equal to the gross of the reserved plot to be surrendered & will proportionately increase or decrease according to the permissible FSI of the Zone where from the TDR has originated and more particularly mentioned in Table No.31", त्यानुसार सदरचे नियम विकास नियंत्रण नियमावलीमध्ये समाविष्ट करण्याच्या फेरबदलास म.प्रा. व न.रा. अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) नुसार कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

मा.जगदीश शेट्टी :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ७ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा अशी सुचना मी मांडतो.

मा.प्रभाकर वाघेरे :- मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक :- ८७१ विषय क्रमांक :- ७

दिनांक :-२०.०५.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.नरवि/कावि/वि.नि.नि./०८/२०१० दि.०४/०२/२०१०

२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.२६० दिनांक ५.२.२०१०

३) मा. महापालिका सभा ठ.क्र.८४९ दिनांक २१.४.२०१० अन्वये

विषय क्रमांक ७ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल-७२ प्रतिकूल -०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ८ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक :- ८

दिनांक :-२०.०५.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.नरवि/कावि/०५/४५/२०१० दि.५.२.२०१०

२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.२७० दि.१९.३.२०१०

३) मा. महापालिका सभा ठ.क्र.८५५ दिनांक २१.४.२०१० अन्वये

पुणे विभागातील पाच महानगरपालिका पुणे महानगरपालिका, पिंपरी चिंचवड महानगरपालिका,कोल्हापूर महानगरपालिका, सोलापूर महानगरपालिका, सांगली मिरज कूपवाड शहर महानगरपालिका व पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण क्षेत्राच्या मंजुर विकास नियंत्रण नियमावलीमध्ये Special Regulation for the safety and security of building to counter man-made disaster बाबत विशेष नियमावलीचा समावेश करणेबाबत शासनाने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम,१९६६ चे कलम ३७(१) (ए ए) अन्वये एकत्रितपणे प्रसिद्ध केलेल्या फेरबदल प्रस्तावावरील हरकती सुचना व मनपाचे अभिप्राय यावर विचार करुन अभिप्रायाप्रमाणे अहवाल पाठविणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.विनायक रणसुभे:- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

मा.महेश लांडगे :- मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- महापालिकेच्या हद्दीत नव्याने समाविष्ट गावांतील मौजे चऱ्होली स.नं.५३० मध्ये आरक्षण क्रमांक २/५८ माध्यमिक शाळा १.८० हेक्टर, वडमुखवाडी येथील स.नं.१५० मध्ये आरक्षण क्रमांक २/३८ दवाखाना क्षेत्र २ हेक्टर, स.नं.१५१ मध्ये आरक्षण क्रमांक २/३६ माध्यमिक विद्यालय क्षेत्र १.८० हेक्टर तसेच चोविसावाडी येथील स.नं.१६४ मध्ये १८ मी. रस्ता व स.नं.१५० मध्ये आरक्षण क्रमांक २/१४ जकात नाका क्षेत्र ०.८० हेक्टर ही सर्व आरक्षणे एकाच मालकाचे जागेत प्रस्तावित आहेत. सदरची आरक्षणांचे संपादन झाल्यास सदर मिळकतधारकांचे उदरनिर्वाहाचे साधन नाहीसे होणार आहे. तरी मानवतेच्या दृष्टीकोनातून वडमुखवाडी येथील स.नं.१५० मधील आरक्षण क्रमांक २/३८ दवाखाना व स.नं.१५१ मधील आरक्षण क्रमांक २/३६ माध्यमिक विद्यालय ही आरक्षणे वगळणेत यावीत व त्याकामी म.प्रा. व न.अ. कलम ३७ अन्वये कार्यवाही करुन सदर प्रस्ताव शासनास पाठविणेस मान्यता देणेत यावी. मौजे भोसरी येथील स.नं.९४,९५ व ९६ पैकी हरित विभागात दर्शविलेल्या मिळकती निवासी विभागात समाविष्ट करणेकामी म.प्रा. व न.अ. १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करण्यास मा.महापालिका सभेने ठराव क्र.६६४, दि.०३/०६/२००९ व ठराव क्र. ७५१ दि. २१/१२/२००९ अन्वये मान्यता दिलेली आहे. सदर ठरावानुसार कार्यवाही पुर्ण झाल्यावर सदर प्रस्ताव शासनास पाठविणेस मान्यता देणेत यावी.

मा.शांताराम भालेकर :- मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देतो.

मा.मीना पाटिल :- मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते-मौजे भोसरी येथील स.नं.२०३ व २०४ मधून भोसरी आळंदी रस्ता ते दिघीकडे जाण्यासाठी १२ मी.रुंदीचा रस्ता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २०५ अन्वये रस्ता घोषित करणेकामी मा. क प्रभाग समिती ठराव क्र. १२३४, दि.०१/०७/२००९ अन्वये मान्यता दिलेली आहे. त्याअनुषंगाने कार्यवाही पुर्ण झालेली आहे. तरी सदर १२ मी. रस्ता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २०५ अन्वये अंतिमरित्या घोषित करणेस व त्याप्रमाणे भूसंपादन करणेस मान्यता देणेत यावी.

मा.सिमा सावळे :- मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देते.

मा.तानाजी खाडे :- मा.मीना पाटील व मा.सिमा सावळे यांची,मा.महेश लांडगे व मा.शांताराम भालेकर यांची उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनांप्रमाणेचा दुरुस्त  ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक :- ८७२ विषय क्रमांक :- ८

दिनांक :-२०.०५.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.नरवि/कावि/०५/४५/२०१० दि.५.२.२०१०

२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.२७० दि.१९.३.२०१०

३) मा. महापालिका सभा ठ.क्र.८५५ दिनांक २१.४.२०१० अन्वये

पुणे विभागातील पाच महानगरपालिका पुणे महानगरपालिका, पिंपरी चिंचवड महानगरपालिका,कोल्हापूर महानगरपालिका, सोलापूर महानगरपालिका, सांगली मिरज कूपवाड शहर महानगरपालिका व पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण क्षेत्राच्या मंजुर विकास नियंत्रण नियमावलीमध्ये Special Regulation for the safety and security of building to counter man-made disaster बाबत विशेष नियमावलीचा समावेश करणेबाबत शासनाने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम,१९६६ चे कलम ३७(१) (ए ए) अन्वये एकत्रितपणे प्रसिद्ध केलेल्या फेरबदल प्रस्तावावरील हरकती सुचना व मनपाचे अभिप्राय यावर विचार करुन अभिप्रायाप्रमाणे अहवाल पाठविणेस मान्यता देणेत येत आहे. महापालिकेच्या हद्दीत नव्याने समाविष्ट गावांतील मौजे चऱ्होली स.नं.५३० मध्ये आरक्षण क्रमांक २/५८ माध्यमिक शाळा १.८० हेक्टर, वडमुखवाडी येथील स.नं.१५० मध्ये आरक्षण क्रमांक २/३८ दवाखाना क्षेत्र २ हेक्टर, स.नं.१५१ मध्ये आरक्षण क्रमांक २/३६ माध्यमिक विद्यालय क्षेत्र १.८० हेक्टर तसेच चोविसावाडी येथील स.नं.१६४ मध्ये १८ मी. रस्ता व स.नं.१५० मध्ये आरक्षण क्रमांक २/१४ जकात नाका क्षेत्र ०.८० हेक्टर ही सर्व आरक्षणे एकाच मालकाचे जागेत प्रस्तावित आहेत. सदरची आरक्षणांचे संपादन झाल्यास सदर मिळकतधारकांचे उदरनिर्वाहाचे साधन नाहीसे होणार आहे. तरी मानवतेच्या दृष्टीकोनातून वडमुखवाडी येथील स.नं.१५० मधील आरक्षण क्रमांक २/३८ दवाखाना व स.नं.१५१ मधील आरक्षण क्रमांक २/३६ माध्यमिक विद्यालय ही आरक्षणे वगळणेत यावीत व त्याकामी म.प्रा. व न.अ. कलम ३७ अन्वये कार्यवाही करुन सदर प्रस्ताव शासनास पाठविणेस मान्यता देणेत येत आहे. मौजे भोसरी येथील स.नं.९४,९५ व ९६ पैकी हरित विभागात दर्शविलेल्या मिळकती निवासी विभागात समाविष्ट करणेकामी म.प्रा. व न.अ. १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करण्यास मा.महापालिका सभेने ठराव क्र.६६४, दि.०३/०६/२००९ व ठराव क्र. ७५१ दि. २१/१२/२००९ अन्वये मान्यता दिलेली आहे. सदर ठरावानुसार कार्यवाही पुर्ण झाल्यावर सदर प्रस्ताव शासनास पाठविणेस मान्यता देणेत येत आहे. मौजे भोसरी येथील स.नं.२०३ व २०४ मधून भोसरी आळंदी रस्ता ते दिघीकडे

जाण्यासाठी १२ मी.रुंदीचा रस्ता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २०५ अन्वये रस्ता घोषित करणेकामी मा. क प्रभाग समिती ठराव क्र. १२३४, दि.०१/०७/२००९ अन्वये मान्यता दिलेली आहे. त्याअनुषंगाने कार्यवाही पुर्ण झ ालेली आहे. तरी सदर १२ मी. रस्ता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २०५ अन्वये अंतिमरित्या घोषित करणेस व त्याप्रमाणे भूसंपादन करणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल-७२ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

मा.विनायक रणसुभे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ९ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक :- ८७३ विषय क्रमांक :- ९
दिनांक :-२०.०५.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक
क्र.प्रशा/१/कावि/४५७/१० दि.१३/०४/२०१०
२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.२८२ दि.७.५.२०१०

शासन आदेशाप्रमाणे श्री.भ.द.घाडगे, वरिष्ठ लेखा अधिकारी यांची मुख्यलेखापरिक्षक पिंपरी चिंचवड महानगरपालिका या पदावर प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्तीनुसार नेमणुक केली असून श्री.घाडगे यांना शासनाने दिनांक १० फेब्रुवारी २०११ पर्यंत तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नतीने गट अ (वरिष्ठ) पदावर पदोन्नती देवुन मुख्यलेखापरिक्षक,पिंपरी चिंचवड महानगरपालिका या पदावर प्रतिनियुक्तीने दि.१०/२/२०११ पर्यंतच्या नियुक्तीस तसेच शासनाचे नगरविकास विभागाची मान्यता प्राप्त होईल या उमेदमान्यतेवर दि.१०/२/२०११ पर्यंत करण्यात आलेल्या नियुक्तीस मान्यता देणेत येत आहे.

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

मा.आर.एस.कुमार :- मा.महापौर साहेब, घाडगे हे मुख्यलेखापरिक्षक म्हणून रुजू झालेले आहेत, या अगोदर राजदेरकर साहेब होते त्यावेळेला आयुक्त साहेबांनी सन २००६-२००९ या कालावधीतील स्थापत्याच्या कामाची इन्क्वॉयरी करण्याचे काम त्यांच्याकडे दिलेले होते. त्याबाबत राजदेरकर यांनी रिपोर्ट सबमिट केलेला आहे

का. त्यांनी सबमिट केलेला नसेलतर राजदेरकर साहेबांनी चार्ज देताना काही संागीतलेले आहे का. सन २००६ ते २००९ या कालावधीतील स्थापत्य विभागाची वाढीव बीलाची इन्क्वॉयरी करण्यासाठी संागीतलेले आहे तरी तो रिपोर्ट सबमिट केलेला आहे का हे संागावे. त्यानी रिपोर्ट सबमिट केला नसेलतर आपण इन्क्वॉयरी करणार का व किती महिन्यामध्ये करणार व कधी रिपोर्ट सबमिट करणार.

मा.घाडगे :- मा.महापौर साहेब, राजदेरकर साहेबांनी असा काही रिपोर्ट दिलेला नाही परंतु त्याबाबतीत त्यांच्याकडून माहिती घेवून कार्यवाही केली जाईल.

मा.आर.एस.कुमार :- मा.महापौर साहेब, आयुक्त साहेबांनी राजदेरकर साहेबांना संागीतलेले होते, त्यांनी रिपोर्ट दिलेला नाही, घाडगे साहेबाकडे चार्ज देताना त्यांनी संागायला पाहिजे होते. आयुक्त साहेबांनी संागीतल्याप्रमाणे राजदेरकर हेच रिपोर्ट सबमिट करणार का हे संागावे.

मा.महापौर :- सभागृहाने आदेश दिलेला होता त्या अनुषंगाने कितपत कार्यवाही झालेली आहे, त्याचे उत्तर सभागृहाला दिले पाहिजे. व्हेरीफिकेशन करण्याची जबाबदारी आयुक्त म्हणून तुमची आहे संबंधित विभागाच्या व्यक्ति काय करतात काय नाही हे बघण्याची जबाबदारी तुमची आहे राजदेरकर यांनी काय केले हे संागावे.

मा.अे.अेस.सावंत :- मा.महापौर साहेब, घाडगे साहेबांनी चार्ज घेतलेला आहे, त्यांनी ते काम किती झाले हे तपासावे,फाईल पहावी आणि पुढची कार्यवाही त्यांनी करावी अशा सूचना दिलेल्या आहेत. जास्तीत जास्त लवकरात लवकर देण्याच्या सुचना त्यांना देतो.

मा.आर.एस.कुमार :- मा.महापौर साहेब, पुढच्या जी.बी.पर्यंत रिपोर्ट द्यायला संागावा.

मा.महापौर :- लवकरात लवकर रिपोर्ट द्यावा, सहा महिने ऑलरेडी झालेले आहेत.

मा.उल्हास शेट्टी :- मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- महापालिका अस्थापनेवर लेखाधिकारी अभिनामाचे सन १९९७ मध्ये ६ पदे शासन मंजूरी होती. दि. २५/८/१९९८ च्या दोन शासन निर्णयाद्वारे २ पदे व दि. २४ मार्च,१९९९ च्या शासन निर्णयाद्वारे ५ पदे याप्रमाणे एकूण १३ लेखाधिकारी पदे मंजूर आहेत. व १३ पदे भरलेली आहेत. शासन निर्णय क्र. बीसीसी-

१०९७/प्र.क्र.६३/९७/१६-ब, दि.१८/१०/१९९७ नुसार मंजूर १३ पदांवर अनु. जमाती प्रवार्गासाठी ७% प्रमाणे ०.९१ म्हणजेच एकाच पदाचे आरक्षण होते व विजाभज प्रवर्गासाठी ११% प्रमाणे १.४३ म्हणजे एका पदाचे आरक्षण येत आहे. सदर पदावर मा.विधी समिती ठराव क्र. ८६, दि. २१/९/१९९६ व मा.महापालिका सभा ठराव क्र. ३४०७, दि. २१/१/९७ अन्वये सेवाजेष्ठतेनुसार श्री.एस.जे.गवळी यांची व श्री.गायकवाड यांची आरक्षित पदावर नेमणुक करण्यास मान्यता दिलेली आहे. तसेच दि. ११/९/९७ च्या निवड समितीने सभावृत्तांतामध्ये श्री.एस.जे.गवळी यांची अनुसूचित जमातीच्या व श्री.डी.वाय.गायकवाड यांची विजाभज प्रवर्गाच्या आरक्षित पदावर नेमणुक केल्याचे स्पष्ट केले आहे. आरक्षणानुसार आवश्यकतेपेक्षा जास्त नियुक्त्या झाल्याने जादा झालेल्या नियुक्त्यांवरील श्री.करंजे व श्री.खामकर यांच्या लेखाधिकारी पदावरील नेमणुका खुल्या जागंवरील असल्याचे ग्राहय धरण्यात यावे.

मा.काळुराम पवार :- मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन देतो.

मा.श्रीरंग बारणे :- मा.महापौर साहेब, खामकराची उपसूचना वाचली गेली आहे. ५ जानेवारी २०१० रोजी हायकोर्टात निकाल झालेला होता खामकर यांना लेखाधिकारी पदावर दिलेली नियुक्ति हीच मुळामध्ये बेकायदेशिर होती. खामकर यांनी जातीच्या आरक्षणाच्या आधारे हि नियुक्ति मिळविलेली होती त्या नियुक्तिला हायकोर्टामध्ये कोणीतरी कर्मचा-यांनी आवाहन दिले होते तो निकाल खामकर यांच्या विरोधात गेलेला आहे. उच्च न्यायालयाचा महापालिकेच्या प्रशासनाने अपमान केलेला आहे. उच्च न्यायालयाने निकाल दिल्यानंतर सुध्दा ते त्याच पदावर रुजू होतात आणि परत त्याच पदावर नियुक्ति होते यात सभागृहाचा अपमान आहे. मुळामध्ये ही उपसूचना बेकायदेशिर आहे. उच्च न्यायालयामध्ये खामकर यांच्या विरोधात निकाल गेलेला आहे. यामुळे खुल्या प्रवर्गातील एखादा कर्मचारी लायक असलातरी त्याच्यावर जाणुनबुजून अन्याय होतो आहे. ही उपसूचना माघारी घेण्यात यावी. खामकर किंवा इतर कर्मचारी असलेतरी सेवाजेष्ठतेनुसार न्याय मिळाला पाहिजे. महापालिका सभागृहामध्ये निर्णय घेत असताना उच्च न्यायालयाने जो निर्णय दिला त्याचा अवमान होता कामा नये अन्यथा उच्च न्यायालयाच्या मी स्वत: निदर्शनास आणून देईल.

मा.आझमभाई पानसरे :- मा.महापौर साहेब, आयुक्तांनी खुलासा करावा.

मा.महापौर :- सन्मा.सदस्यांनी उपसूचना दिलेली आहे. खामकर हे त्या प्रवर्गामध्ये गेली कित्येक वर्षे काम करतात. ओपनमध्ये त्यांना द्यावे असा विषय आहे.

मा.श्रीरंग बारणे :- मा.महापौर साहेब, उच्च न्यायालयाने दिलेला निर्णय महापालिका प्रशासनाकडे आलेला होता त्यावेळेलाच त्यांना तात्काळ लेखाधिकारी पदावरुन रिर्व्हट करायला पाहिजे होते परंतु प्रशासनाने असे केलेले नाही, उच्च न्यायालयाचा अपमान केलेला आहे.

मा.पवार (प्रशासन अधिकारी,अस्था.) :- मा.महापौर साहेब, खामकर यंाचे जातीचे प्रमाणपत्र अवैद्य ठरलेले आहे.

मा.आझमभाई पानसरे :- मा.महापौर साहेब, जी उपसूचना दिलेली आहे ती घेवू नका. सभागृहात चुकिचा विषय पास करायचा नाही. जो मुळ विषय आहे तो पास करावा. कोर्टाने सांगीतले असेल, जातीचे प्रमाणपत्र चुकिचे दिलेले असेलतर तो विषय घेवू नका. अशा गोष्टी नजरेस आल्यातर त्या करु नका. ही उपसूचना वगळून टाकावी.

मा.उल्हास शेट्टी :- मा.महापौर साहेब, मी उपसूचना मागे घेत आहे.

मा.काळूराम पवार :- मा.महापौर साहेब, अनुमोदन देतो.

मा.महापौर :- सभागृहाच्या परवानगीने उपसुचना मागे घेतलेली आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-
अनुकूल- ७२ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १० वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक :- १०

दिनांक :-२०.०५.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.प्रशा/१/कावि/४५५/१० दि.१३/०४/२०१०
२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.२८३ दि.७.५.२०१०

श्री.सुभाष डुंबरे, अतिरिक्त आयुक्त यांना प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्तीनुसार दिनांक ०२/४/२०१० पासून पुढे १ वर्ष कालावधीकरीता मुदतवाढ देण्यास मान्यता देणेची मागणी अमान्य करणेत येत आहे.

मा.विनायक रणसुभे :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

मा.मंगलाताई कदम :- मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसुचना मांडते- “मुदतवाढ देण्यास मान्यता देणेची मागणी अमान्य करणेत येत आहे” हा मजकुर वगळुन त्याऐवजी “मुदतवाढ देण्याऐवजी दि.३१/०५/२०१० अखेरपर्यंत मुदतवाढ देवुन, दि.३१/०५/२०१० रोजी कार्यालयीन वेळेनंतर कार्यमुक्त करणेस व सदरचे रिक्त होणारे अतिरिक्त आयुक्त पदावर सेवाजेष्ठ व अर्हताधारक श्री.अे.एस.सावंत, सहा.आयुक्त यांची पदोन्नतीने नेमणुक करणेस मान्यता देणेत येत आहे” हा मजकुर समाविष्ट करणेत यावा.

मा.आझमभाई पानसरे :- मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन देतो.

मा.आर.एस.कुमार :- मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो-
लेखा विभागाचे मुख्यलेखापाल हे पद श्री.एन.एन.लोंढे, मुख्य लेखापाल हे दि.३१/५/२०१० रोजी सेवानिवृत्त होत असलेने रिक्त होत आहे व लेखा विभागाच्या कामकाजाच्या दृष्टीने सदर पद भरणे आवश्यक असलेने लेखाअधिकारी यांच्या सेवा जेष्ठता यादीतील प्रथम क्रमांकावरील लेखाअधिकारी श्री.विलास भोसले यांच्या महानगरपालिकेतील निरनिराळ्या पदावरील ३० वर्षे चा अनुभव लक्षात घेवून त्यांची मुख्यलेखापाल या पदावर नेमणूक करणेस मान्यता देणेत यावी.

मा.राजू मिसाळ :- मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन देतो.

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब,मा.आर.एस.कुमार व मा.राजू मिसाळ यांची मा.मंगलाताई कदम व मा.आझमभाई पानसरे यांची उपसूचना स्विकारली आहे.

मा.श्रीरंग बारणे :- मा.महापौर साहेब, या अगोदर सावंत साहेबांचा विषय आलेला होता त्यावेळेला मी विरोध केलेला होता परंतु या ठरावाला पाठिंबा देतो. प्रामुख्याने महापालिकेच्या अधिका-यांच्या बाजूने लढायला पाहिजे. शासन प्रतिनियुक्तीवर आलेले अधिकारी महापालिकेत आल्यानंतर त्यांच्या डोक्यामध्ये हवा घुसते. सावंत साहेब तुमच्या उर्वरीत कार्याला मनपुर्वक शुभेच्छा देतो. महापालिकेच्या अति.आयुक्त पदावर नियुक्ती झाल्यानंतर सर्व सदस्यांना विश्वासात घेवून काम करावे.

मा.भाऊसाहेब भोईर :- मा.महापौर साहेब, खरेतर सावंत साहेबांचा हा विषय अविस्मरणीय आहे त्याचे कारण असे की, वेळ यावी लागते. एवढया मोठया पदावर बसुन त्यांनी त्यांचा विषय केला. खेळ प्रशासनाचा सुरु होईल. मी वेगळया अर्थाने अभिनंदन करतो. एकही सभासद तुमच्या बरोबर नव्हता, तुमच्या मध्ये जो अमुलाग्र बदल झालेला आहे त्याचा हा परिणाम आहे. सावंत साहेब आपल्याला चांगली संधी मिळालेली आहे. ज्येष्ठ सभासद असतात त्यांचे सर्वजण ऐकत असतात, तरी विश्वासाला तडा जावु देवू नये.

मा.महापौर :- त्यांची श्रध्दा आणि सबुरी कामाला आलेली आहे.

मा.आझमभाई पानसरे :- मा.महापौर साहेब, ब-याच वर्षापासुन हा विषय होता. ब-याचशा सदस्यांचा पाठिंबा व विरोधही होता. याला कारण मुख्यत्वे भाऊसाहेबांनी सांगीतलेले आहे. त्याला सावंत साहेब जबाबदार होते. ते जे काम करतात ते निश्चितपणे महापालिकेचे हित डोळयासमोर ठेवून करतात. कुठलीही गोष्ट करत असताना महापालिकेचा फायदा होईल याकडे कटाक्षाने पाहिलेले आहे. आमची इच्छा अशी राहिल की भविष्यामध्ये सुध्दा असेच काम करावे परंतु लोकप्रतिनिधी आणि जे सदस्य याठिकाणी निवडून आलेले आहेत त्यांचा सुध्दा मान-सन्मान केला पाहिजे. प्रत्येक सदस्यांची इच्छा असते आपल्या वॉर्डामध्ये, आपल्या परिसरामध्ये महापालिकेच्या माध्यमातून जे काम व्हायला पाहिजे ते व्हावे कामांसाठी कुठलाही सदस्य आपल्याकडे आला,महिला भगिनी आपल्याकडे आल्यातर त्यावेळेला त्यातून मार्ग काढला पाहिजे. आपण कायद्यावर बोट ठेवून काम करु नये मनामध्ये असेलतर आपण मार्ग काढू शकतो. नवीन सभासदांकडे सुध्दा जास्त लक्ष द्यावे.

मा.आर.एस.कुमार :- मा.महापौर साहेब, गेल्या वेळेस सावंत साहेबांचा मंगलाताई कदम यांनी ठराव मांडलेला होता आम्ही विरोध केला होता. ते हुशार आहेत, अनुभवी आहेत, त्यांच्या कामाचा अनुभव बघून सर्व आयुक्त जवळ करतात. आम्ही ज्यावेळेला काम घेवून येवू त्यावेळेला कायद्यामध्ये बसत नाही असे सांगण्यापेक्षा ते कायद्यामध्ये बसून काम करावे. अधिकारी वर्गाची जशी सिनॅरिटी वाढते तसे स्टार वाढतात. आमचे तसे नाही प्रत्येक वेळेस पाच वर्षानंतर पब्लिक समोर जावे लागते आणि निवडून यावे लागते. कायद्यात बसून जोपर्यंत काम करता येते तोपर्यंत ते करावे. ते प्राधिकरणात राहायला आहेत, प्राधिकरणातील एक व्यक्ति ॲडीशनल कमीशनर होणार त्यामुळे आनंद होत आहे. आपल्याला पदोन्नती दिली असे समजून तुम्हांला शुभेच्छा देतो.

यानंतर उपसूचनांप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक :- ८७४ विषय क्रमांक :- १०
दिनांक :-२०.०५.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.प्रशा/१/कावि/४५५/१० दि.१३/०४/२०१०
२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.२८३ दि.७.५.२०१०

श्री.सुभाष डुंबरे, अतिरिक्त आयुक्त यांना प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्तीनुसार दिनांक ०२/४/२०१० पासून पुढे १ वर्ष कालावधीकरीता मुदतवाढ देण्याऐवजी दि.३१/०५/२०१० अखेरपर्यंत मुदतवाढ देवुन, दि.३१/०५/२०१० रोजी कार्यालयीन वेळेनंतर कार्यमुक्त करणेस व सदरचे रिक्त होणारे अतिरिक्त आयुक्त पदावर सेवाजेष्ठ व अर्हताधारक श्री.अे.एस.सावंत, सहा.आयुक्त यांची पदोन्नतीने नेमणुक करणेस मान्यता देणेत येत आहे. लेखा विभागाचे मुख्यलेखापाल हे पद श्री.एन.एन.लोंढे, मुख्य लेखापाल हे दि.३१/५/२०१० रोजी सेवानिवृत्त होत असलेने रिक्त होत आहे व लेखा विभागाच्या कामकाजाच्या दृष्टीने सदर पद भरणे आवश्यक असलेने लेखाअधिकारी यांच्या सेवा जेष्ठता यादीतील प्रथम क्रमांकावरील लेखाअधिकारी श्री.विलास भोसले यांच्या महानगरपालिकेतील निरनिराळ्या पदावरील ३० वर्षे चा अनुभव लक्षात घेवून त्यांची मुख्यलेखापाल या पदावर नेमणूक करणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल-७२ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

मा.विनायक रणसुभे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ११ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक :- ८७५ विषय क्रमांक :- ११
दिनांक :-२०.०५.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.प्रशा/१/कावि/४६५/१० दि.१६/०४/२०१०
२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.२८४ दि.७.५.२०१०

श्री.शहाजी पवार, सहा.आयुक्त यांना दि.२३/३/२०१० पासून पुढे ०१ वर्ष कालावधीसाठी मुदतवाढ देण्यास मान्यता देणेत येत आहे.

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल-७२ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

मा.विनायक रणसुभे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १२ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक :- १२

दिनांक :-२०.०५.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.प्रशासन/१/कावि/४८९/१० दि.२३/०४/२०१०

२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.२९५ दि.७.५.२०१०

श्री.अशोक मुंढे यांची दिनांक २६/६/२००९ पासून दिनांक ३१/८/२००९ पर्यंतच्या कालावधीसाठी अधिसंख्य असलेले सहा.आयुक्त या अभिनामाचे तात्पुरत्या स्वरुपातील पद निर्माण करुन सदर पदावर नियुक्ती करणेस व महानगरपालिका आस्थापनेवर सहा.आयुक्त या पदावर कार्यरत असलेले अधिकारी श्री.बी.एन कांबळे हे महानगरपालिका सेवेमधून नियत वयोमानानुसार दि.३१/०८/२००९ रोजी सेवानिवृत्त झाले असल्याने सहा.आयुक्त या अभिनामाचे ०१ पद रिक्त झालेले असल्याने सदरच्या रिक्त झालेल्या पदावर श्री.अशोक मुंढे यांची दि.०१/९/०९ पासून ०१ वर्ष कालावधीसाठी नियुक्ती करणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.राजु मिसाळ :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

मा.भाऊसाहेब भोईर :- मा.महापौर साहेब, जकात हा संपुर्ण महापालिकेचा कणा आहे. मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- श्री.अशोक मुंढे यांची ०१ वर्ष ऐवजी ०२ वर्ष कालावधीसाठी नियुक्ती करणेस मान्यता देणेत यावी.

मा.सतीष दरेकर :- मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन देतो.

मा.विनायक रणसुभे :- मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक :- ८७६ विषय क्रमांक :- १२
दिनांक :-२०.०५.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक
क्र.प्रशासन/१/कावि/४८९/१० दि.२३/०४/२०१०
२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.२९५ दि.७.५.२०१०

श्री.अशोक मुंढे यांची दिनांक २६/६/२००९ पासून दिनांक ३१/८/२००९ पर्यंतच्या कालावधीसाठी अधिसंख्य असलेले सहा.आयुक्त या अभिनामाचे तात्पुरत्या स्वरुपातील पद निर्माण करुन सदर पदावर नियुक्ती करणेस व महानगरपालिका आस्थापनेवर सहा.आयुक्त या पदावर कार्यरत असलेले अधिकारी श्री.बी.एन कांबळे हे महानगरपालिका सेवेमधून नियत वयोमानानुसार दि.३१/०८/२००९ रोजी सेवानिवृत्त झाले असल्याने सहा.आयुक्त या अभिनामाचे ०१ पद रिक्त झालेले असल्याने सदरच्या रिक्त झालेल्या पदावर श्री.अशोक मुंढे यांची दि.०१/९/०९ पासून ०२ वर्ष कालावधीसाठी नियुक्ती करणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल-७२ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १३ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक :- १३
दिनांक :-२०.०५.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.जशुके/पापु/५८०/१०
दि.१२/०४/२०१०
२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.२९६ दि.७.५.२०१०

जलशुध्दीकरण केंद्र से.नं.२३ येथील टप्पा ३ संपवेलवर वाढीव पंपहाउसचे बांधकाम करणेकामी र.रु.६९,८२,८००/-चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

मा.आर.एस.कुमार :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

मा.विनायक रणसुभे :- मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो-थेरगाव प्र.क्र.१५ मधील कांतीलाल खिंवसरा आणि नागु बारणे शाळा इमारतींचे विस्तारीकरण करणे (निविदा क्र.६९/०६/२००५/०६) कामाचा आदेश ठेकेदारास दि.३०/०८/२००६ रोजी देण्यात आलेला आहे. सदर कामाचे ठेकेदार मे.होनाई कन्स्ट्रक्शन हे आहेत. सदर कामाची अंदाजपत्रकीय र.रू. ४८,४९०००/- एवढी आहे. सदरचे काम शाळा इमारत बांधणेचे आहे. सदरचे कामाचा आदेश जुन्या स्वरूपाचा असल्याने कामाचा आदेश घेतल्यानंतर बांधकाम साहित्यामध्ये बऱ्याच प्रमाणात वाढ झालेली आहे. त्यामुळे सदर कामाचा भाववाढ फरक जास्त प्रमाणात येत आहे. म्हणजेच र.रू.११,८२,७३३/- एवढा येत आहे. तसेच सदर काम करताना शाळा इमारतीचे असल्याने संपुर्ण काम करण्यासाठी र.रू.१,५९,७५७/- एवढी रक्कम कामाच्या मर्यादेपेक्षा जास्त झालेली आहे. तरी एकुण वाढीव र.रू.१३,४२,४९०/- एवढी येत आहे. तरी थेरगाव प्र.क्र.१५ मधील कांतीलाल खिंवसरा आणि नागु बारणे शाळा इमारतींचे विस्तारीकरण करणे चे कामास वाढीव र.रू.१३,४२,४९०/- एवढी आहे. त्यामुळे सदर कामास एकुण र.रू.६७,००,०००/- च्या रकमेस सुधारीत प्रशासकीय मान्यता देणेत यावी.

मा.प्रभाकर वाघेरे :- मा.महापौर साहेब, उपसुचनेला अनुमोदन देतो.

मा.श्रीरंग बारणे :- मा.महापौर साहेब, रावेत जलउपसा केंद्रातून शहराला पाणीपुरवठा होतो. कालच वर्तमानपत्रामध्ये बातमी आलेली होती त्या बंधा-यावर गाडया धुतल्या जातात,नदीपात्रामध्ये घाण टाकणे असे प्रकार त्याठिकाणी होतात. व शहराला पाणीपुरवठा त्याठिकाणाहून होतो. याबाबतीत प्रशासनाने दखल घेवून त्याठिकाणी सुरक्षा व्यवस्था पुरवावी. जेणेकरुन शहराला पाणीपुरवठा होतो त्याठिकाणी काही अनुचीत प्रकार घडू नये.

मा.महापौर :- त्वरीत दखल घेणेत यावी, अतीशय चांगली सूचना आहे.

मा.गणेश भोंडवे :- मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो-प्रभाग क्र.१३ मधील रहाटणी व पिंपळे सौंदागर येथील जुन्या पाईपलाईन काढुन नविन पाईपलाईन पुरविणे व टाकणेचे कामासाठी येणाऱ्या खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत यावी.

मा.राजू मिसाळ :- मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन देतो.

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, मा.गणेश भोंडवे व मा.राजू मिसाळ यांची मा.विनायक रणसूभे व मा.प्रभाकर वाघेरे यांची उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनांप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक :-८७७ विषय क्रमांक :- १३
दिनांक :-२०.०५.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.जशुके/पापु/५८०/१० दि.१२/०४/२०१०
२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.२९६ दि.७.५.२०१०

जलशुध्दीकरण केंद्र से.नं.२३ येथील टप्पा ३ संपवेलवर वाढीव पंपहाउसचे बांधकाम करणेकामी र.रु.६९,८२,८००/-चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. थेरगाव प्र.क्र.१५ मधील कांतीलाल खिंवसरा आणि नागु बारणे शाळा इमारतींचे विस्तारीकरण करणे (निविदा क्र.६९/०६/२००५/०६) कामाचा आदेश ठेकेदारास दि.३०/०८/२००६ रोजी देण्यात आलेला आहे. सदर कामाचे ठेकेदार मे.होनाई कन्स्ट्रक्शन हे आहेत. सदर कामाची अंदाजपत्रकीय र.रू. ४८,४९०००/- एवढी आहे. सदरचे काम शाळा इमारत बांधणेचे आहे. सदरचे कामाचा आदेश जुन्या स्वरूपाचा असल्याने कामाचा आदेश घेतल्यानंतर बांधकाम साहित्यामध्ये बऱ्याच प्रमाणात वाढ झालेली आहे. त्यामुळे सदर कामाचा भाववाढ फरक जास्त प्रमाणात येत आहे. म्हणजेच र.रू.११,८२,७३३/- एवढा येत आहे. तसेच सदर काम करताना शाळा इमारतीचे असल्याने संपुर्ण काम करण्यासाठी र.रू.१,५९,७५७/- एवढी रक्कम कामाच्या मर्यादेपेक्षा जास्त झालेली आहे. तरी एकुण वाढीव र.रू.१३,४२,४९०/- एवढी येत आहे. तरी थेरगाव प्र.क्र.१५ मधील कांतीलाल खिंवसरा आणि नागु बारणे शाळा इमारतींचे विस्तारीकरण करणे चे कामास वाढीव र.रू.१३,४२,४९०/- एवढी आहे. त्यामुळे सदर कामास एकुण र.रू.६७,००,०००/- च्या रकमेस सुधारीत प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. प्रभाग क्र.१३ मधील रहाटणी व पिंपळे सौंदागर येथील जुन्या पाईपलाईन काढुन नविन पाईपलाईन पुरविणे व टाकणेचे कामासाठी येणाऱ्या खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल-७२ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-- ----

मा.विनायक रणसुभे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १४ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक :-८७८ विषय क्रमांक :- १४
दिनांक :-२०.०५.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.सिद्धेश्वर बारणे,मा.स्मिता गुंजेकर यांचा प्रस्ताव...
२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.३०१ दि.७.५.२०१०

स्थापत्य विभागामधील उपअभियंता श्री.शरद दादाभाऊ जाधव यांचे पदोन्नतीने किंवा इतर पदोन्नतीमुळे अनुसूचित जाती या प्रवर्गातील उपअभियंता (स्थापत्य) या पदाच्या रिक्त होणाऱ्या जागेवर अनुसूचीत जाती या प्रवर्गातील पदवीधारक सेवाज्येष्ठतेमध्ये पहिले असलेले कनिष्ठ अभियंता, श्री. राजेंद्र कुंडलिक जावळे यांना उपअभियंता (स्थापत्य) या पदावर पदोन्नती देणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ७२ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

मा.विनायक रणसुभे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १५ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक :- १५
दिनांक :-२०.०५.२०१० विभाग :- मा.प्रशासन अधिकारी (शिक्षणमंडळ)

संदर्भ :- १) क्र.शिमं/अस्था/कावि/१२८/२०१०, दि. ०४/०३/२०१०
२) मा.शिक्षणमंडळाकडील ठ.क्र.६०४ दि. ३०.३.२०१०

विषय क्र.१० - शिक्षण मंडळाच्या अस्थापनेवरील शिपाई कर्मचा-यांचे वारसास अनुकंपा तत्वावर मनपा सेवे मध्ये नोकरी मिळणेबाबत.
(सर्वसाधारण सभा क्रं.१५ दि. ०९/०३/२०१० चा तहकूब विषय)

शिक्षण मंडळाच्या अस्थापनेवर असणा-या शिक्षक कर्मचा-यांच्या वारसास मनपा सेवेमध्ये नोकरीत समावुन घेण्यासाठी शिक्षण मंडळ कार्यालयाकडून ठराव क्र. १५३ दि.०२/०७/१९९० रोजी मंजूर करण्यात आलेला आहे. त्या अनुशंगाने मा.महापालिका सभेमध्ये ठराव क्रं. १६२५ दि. ०६/०९/१९९० रोजी मंजूर झालेला आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये हद्य वाढीमुळे दापोडीगांव पिंपरी चिंचवड मनपा कडे वर्ग करण्यात आले आहे. त्यामुळे यापुर्वी पुणे मनपाच्या अखत्यारीत असलेल्या दापोडी मधील शाळा व तेथील सर्व शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी दि. ०१/०२/२००० पासून पिंपरी चिंचवड मनपाकडे वर्ग करण्यात आले आहेत. त्या मधील खालील कर्मचारी सध्या शिक्षण मंडळाच्या अस्थापनेवर कार्यरत आहेत.

| क्रं. | नाव | पद | शाळा | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | श्री.काशिनाथ आनंदा ढोले | शिपाई | दापोडी शाळा क्रं. ७६ | कार्यरत |
| २ | श्री.मोहन पांडूरंग निगडे | शिपाई | दापोडी शाळा क्रं.७६ | कार्यरत |
| ३ | श्रीम.राधा काळूराम खेसे | शिपाई | दापोडी शाळा क्रं.५३ | कार्यरत |
| ४ | श्रीम.शैला शशिकांत शिंदे | शिपाई | दापोडी शाळा क्रं.१२१ | सेवानिवृत्त |
| ५ | श्री.रामचंद्र महादेव कोळी | शिपाई | दापोडी शाळा क्रं.३७ | मयत |
| ६ | श्री.हेमंत तुकाराम गायकवाड | शिपाई | दापोडी शाळा क्रं.९३ | कार्यरत |

शिक्षक कर्मचा-यांप्रमाणेच वरील प्रमाणे शिपाई पदावर कार्यरत असणा-या कर्मचा-यांचा सेवा काळात मृत्यू झाल्यास त्यांच्या जवळच्या वारसास उदरनिर्वाहाचे साधन उपलब्ध करुन देणेकामी मनपा सेवेत अनुकंपा तत्वावर नोकरीत सामावुन घेणे जरुरीचे आहे. तरी त्याप्रमाणे सदरचा विषय मंजूरीसाठी शिक्षण मंडळ सभेपुढे ठेवण्यात आला होता. त्यावर सभेत सांगोपांग चर्चा होवुन शिक्षण मंडळ अस्थापनेवर कार्यरत असलेल्या शिक्षक प्रमाणेच शिपाई कर्मचा-यांच्या वारसांस देखील अनुकंपा तत्वावर मनपा सेवेत नोकरीत सामावुन घेण्यास मान्यता देणेची शिफारस करणेत आली आहे त्याप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

मा.उल्हास शेट्टी :- मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो-शिक्षण मंडळ आस्थापनेवर पुणे मनपा शिक्षण मंडळाकडून हद्दवाडीमुळे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा १/२/२००० पासून समावेशन करण्यात आले आहे. शिक्षकांना यथास्थितीत सामावून घेण्यात आले आहे मात्र शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सामावून

घेण्याचा प्रश्न प्रलंबित होता तो मनपा सभा ठराव क्रमांक ५४५८ दिनांक ६/५/२००५ अन्वये शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सामावून घेऊन मनपा आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांप्रमाणे वेतन व इतर लाभ देण्यात येत आहे. तथापी सदर कर्मचाऱ्यांना मनपा आस्थापनावरील कर्मचाऱ्यांप्रमाणे घर कर्ज, वाहन कर्ज, संगणक कर्ज, व भविष्यात देय होणारे कर्ज इत्यादी लाभ देण्यात येत नाहीत तरी खालील कर्मचाऱ्यांना मनपा कर्मचाऱ्याप्रमाणे वरील लाभ देण्यास व त्यांच्या कडून मनपा / शासन नियमाप्रमाणे कर्ज वसुली करण्यास मान्यता देणेत यावी.

| अ.क्र. | नांव | पद | शाळा | कार्यरत |
|---|---|---|---|---|
| १ | श्री.काशीनाथ आनंदा ढोले | शिपाई | दापोडी शाळा क्र.७६ | कार्यरत |
| २ | श्री.मोहन पांडूरंग निगडे | शिपाई | दापोडी शाळा क्र.७६ | कार्यरत |
| ३ | श्रीम.राधा काळूराम खेसे | शिपाई | दापोडी शाळा क्र.५३ | कार्यरत |
| ४ | श्रीम.शैला शशिकांत शिंदे | शिपाई | दापोडी शाळा क्र.१२१ | सेवानिवृत्त |
| ५ | श्री.रामचंद्र महादेव कोळी | शिपाई | दापोडी शाळा क्र.३७ | मयत |
| ६ | श्री.हेमंततुकाराम गायकवाड | शिपाई | दापोडी शाळा क्र.९३ | कार्यरत |

मा.राजू मिसाळ :- मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन देतो.

मा.विनायक रणसुभे :- मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

मा.महापौर :- शिक्षण मंडळाचा विषय आहे, इतर कर्मचा-यांप्रमाणे त्यांना मिळेल.

मा.उल्हास शेट्टी :- मा.महापौर साहेब, इतर आलेल्या कर्मचा-यांना मिळत नाही.

मा.चंद्रकांता सोनकांबळे :- मा.महापौर साहेब, पुणे महापालिकेतून आलेले कर्मचारी आहेत त्यांना अगोदरच द्यायला पाहिजे होते.

मा.सुलभा उबाळे :- मा.महापौर साहेब, शिक्षणमंडळाचा वारस नेमणूकीचा विषय आहे. गेल्या वर्षापासून शिक्षणमंडळामध्ये एकतर्फी नेमणूकीचा निर्णय होतो. मागच्या महिन्यामध्ये २२ शिक्षक वर्ग करण्यात आले. जास्त पद वर्ग करुन घेतलेले आहेत. शिक्षणमंडळाचे विषय याठिकाणी येतात. ११० नगरसेवक याठिकाणी आहेत. शिक्षणमंडळामध्ये जे काम करतात त्यांना एखाद्या नगरसेवकांनी सुचविले हा शिक्षक परिचयाचा आहे त्यांना वर्ग करायचे आहे तर एकाचीही सूचना ऐकली आहे व तो

विषय केला आहे असे वाटत नाही. एकतर्फी नेमणूक आहे त्यांना हे बंद करायला सांगावे सरळ पध्दतीने डीएड शिक्षकांची भरती व्हावी याठिकाणच्या, पिंपरी चिंचवडच्या लोकांना संधी मिळावी अशी सूचना शिक्षण मंडळाला करावी.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक :-८७९ विषय क्रमांक :- १५
दिनांक :-२०.०५.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ :- १) क्र.शिमं/अस्था/कावि/१२८/२०१०, दि. ०४/०३/२०१०
२) मा.शिक्षणमंडळाकडील ठ.क्र.६०४ दि. ३०.३.२०१०

विषय क्र.१० - शिक्षण मंडळाच्या अस्थापनेवरील शिपाई कर्मचा-यांचे वारसास अनुकंपा तत्वावर मनपा सेवे मध्ये नोकरी मिळणेबाबत.
(सर्वसाधारण सभा क्रं.१५ दि. ०९/०३/२०१० चा तहकूब विषय)

शिक्षण मंडळाच्या अस्थापनेवर असणा-या शिक्षक कर्मचा-यांच्या वारसास मनपा सेवेमध्ये नोकरीत समावुन घेण्यासाठी शिक्षण मंडळ कार्यालयाकडून ठराव क्र. १५३ दि.०२/०७/१९९० रोजी मंजूर करण्यात आलेला आहे. त्या अनुशंगाने मा.महापालिका सभेमध्ये ठराव क्रं. १६२५ दि. ०६/०९/१९९० रोजी मंजूर झालेला आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये हद्द वाढीमुळे दापोडीगांव पिंपरी चिंचवड मनपा कडे वर्ग करण्यात आले आहे. त्यामुळे यापुर्वी पुणे मनपाच्या अखत्यारीत असलेल्या दापोडी मधील शाळा व तेथील सर्व शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी दि. ०१/०२/२००० पासून पिंपरी चिंचवड मनपाकडे वर्ग करण्यात आले आहेत. त्या मधील खालील कर्मचारी सध्या शिक्षण मंडळाच्या अस्थापनेवर कार्यरत आहेत.

| क्रं. | नाव | पद | शाळा | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | श्री.काशिनाथ आनंदा ढोले | शिपाई | दापोडी शाळा क्रं. ७६ | कार्यरत |
| २ | श्री.मोहन पांडूरंग निगडे | शिपाई | दापोडी शाळा क्रं.७६ | कार्यरत |
| ३ | श्रीम.राधा काळूराम खेसे | शिपाई | दापोडी शाळा क्रं.५३ | कार्यरत |
| ४ | श्रीम.शैला शशिकांत शिंदे | शिपाई | दापोडी शाळा क्रं.१२१ | सेवानिवृत्त |
| ५ | श्री.रामचंद्र महादेव कोळी | शिपाई | दापोडी शाळा क्रं.३७ | मयत |
| ६ | श्री.हेमंत तुकाराम गायकवाड | शिपाई | दापोडी शाळा क्रं.९३ | कार्यरत |

शिक्षक कर्मचा-यांप्रमाणेच वरील प्रमाणे शिपाई पदावर कार्यरत असणा-या कर्मचा-यांचा सेवा काळात मृत्यू झाल्यास त्यांच्या जवळच्या वारसास उदरनिर्वाहाचे साधन उपलब्ध करुन देणेकामी मनपा सेवेत अनुकंपा तत्वावर नोकरीत सामावुन घेणे जरुरीचे आहे. तरी त्याप्रमाणे सदरचा विषय मंजूरीसाठी शिक्षण मंडळ सभेपुढे

ठेवण्यात आला होता. त्यावर सभेत सांगोपांग चर्चा होवुन शिक्षण मंडळ अस्थापनेवर कार्यरत असलेल्या शिक्षक प्रमाणेच शिपाई कर्मचा-यांच्या वारसांस देखील अनुकंपा तत्वावर मनपा सेवेत नोकरीत सामावुन घेण्यास मान्यता देणेची शिफारस करणेत आली आहे त्याप्रमाणे मान्यता देणेत येत आहे. शिक्षण मंडळ आस्थापनेवर पुणे मनपा शिक्षण मंडळाकडून हद्दवाडीमुळे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा १/२/२००० पासून समावेशन करण्यात आले आहे. शिक्षकांना यथास्थितीत सामावून घेण्यात आले आहे मात्र शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सामावून घेण्याचा प्रश्न प्रलंबित होता तो मनपा सभा ठराव क्रमांक ५४५८ दिनांक ६/५/२००५ अन्वये शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सामावून घेऊन मनपा आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांप्रमाणे वेतन व इतर लाभ देण्यात येत आहे. तथापी सदर कर्मचाऱ्यांना मनपा आस्थापनावरील कर्मचाऱ्यांप्रमाणे घर कर्ज, वाहन कर्ज, संगणक कर्ज, व भविष्यात देय होणारे कर्ज इत्यादी लाभ देण्यात येत नाहीत.तरी खालील कर्मचाऱ्यांना मनपा कर्मचाऱ्याप्रमाणे वरील लाभ देण्यास व त्यांच्या कडून मनपा / शासन नियमाप्रमाणे कर्ज वसुली करण्यास मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | नांव | पद | शाळा | कार्यरत |
|---|---|---|---|---|
| १ | श्री.काशीनाथ आनंदा ढोले | शिपाई | दापोडी शाळा क्र.७६ | कार्यरत |
| २ | श्री.मोहन पांडूरंग निगडे | शिपाई | दापोडी शाळा क्र.७६ | कार्यरत |
| ३ | श्रीम.राधा काळूराम खेसे | शिपाई | दापोडी शाळा क्र.५३ | कार्यरत |
| ४ | श्रीम.शैला शशिकांत शिंदे | शिपाई | दापोडी शाळा क्र.१२१ | सेवानिवृत्त |
| ५ | श्री.रामचंद्र महादेव कोळी | शिपाई | दापोडी शाळा क्र.३७ | मयत |
| ६ | श्री.हेमंत तुकाराम गायकवाड | शिपाई | दापोडी शाळा क्र.९३ | कार्यरत |

अनुकूल -७२ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १६ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक :- १६

दिनांक :-२०.०५.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.अति/२/कावि/४१/२०१० दि.१०.०२.२०१०

२) मा.महापालिका सभा ठराव क्र.८५७ दि.२१/०४/२०१०

अन्वये

विषय :- अनाधिकृत बांधकाम केलेल्या नगरसदस्यावर मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे कलम १२ अन्वये न्यायालयात संदर्भ करण्यासाठी परवानगी मिळणेबाबत-

श्री.संभाजी बारणे यांनी माहितीच्या अधिकारात करसंकलन विभागाकडून मिळविलेल्या माहितीप्रमाणे पिंपरी चिंचवड महापालिकेचे २५ नगरसदस्य/नगरसदस्या अनाधिकृत बांधकामाशी निगडीत असुन अशा नगरसदस्यावर कारवाई करण्यासाठीची विनंती महाराष्ट्र शासनाकडे करण्यात आली होती. शासनाने मनपा आयुक्ताकडे हे अर्ज चौकशीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी पाठविले आहे.

या अर्जाच्या चौकशीकामी सर्व नगरसेवकांना कारणे दाखवा नोटीसा बजावून त्यांचा त्या संदर्भात खुलासा मागविणेत आला होता. त्यात काही नगरसदस्याचा खुलासा समाधान कारक असुन काही नगरसेवकांनी मात्र अनाधिकृत बांधकामे केलेली आहेत./ होती. असे प्रथम दर्शनी दिसुन येत आहे. अनाधिकृत बांधकामे गुंठेवारी कायद्यानुसार नियमानुकुल झालेली असली तरी त्यामुळे अशा नगरसेवकांवर अपात्रता सिध्द होते वा नाही ही बाब न्यायालयाकडे संदर्भ करुनच खात्री करणे शक्य आहे.

तसेच काही नगरसेवकांनी आपले खुलाशात सदरची मालमत्ता / बांधकामे आपले नसुन आपले वडिल / आई / इतर नातेवाईक यांचे आहेत असे आपल्या खुलाशात नमुद केलेले आहे व त्याप्रमाणे करसंकलन विभागाकडे दुरुस्त नोंदीचे कागदपत्र सादर केलेले आहेत. तथापि संबंधित नगरसेवकांनी निवडणूक नामनिर्देशन पत्र भरतेवेळी केलेले मालमत्ता विषयक प्रतिज्ञापत्र पाहता सदरची मालमत्ता त्यांनी त्यांचे नावे असल्याचे प्रतिज्ञापत्रात नमुद केलेले आहे. अशा प्रसंगी संबंधित नगरसेवक अपात्र होईल वा कसे याचा न्यायालयांनी निर्णय देणे योग्य राहील व त्यासाठी न्यायालयाकडे संदर्भ करणे गरजेचे आहे.

या पार्श्वभूमीवर उक्त अधिनियमाचे कलम १२ प्रमाणे नगरसदस्यांनी केलेल्या अनाधिकृत बांधकामाविषयी वाद उत्पन्न झाला असल्याने त्याविषयी न्यायाधिशांकडून निर्णय प्राप्त करुन घेणे आवश्यक झालेले आहे. तथापि कलम १२ तील तरतुदीप्रमाणे असा संदर्भ न्यायालयाकडे करण्यासाठी सभागृहाने आयुक्तांना निर्देश देणे/विनंती करणे आवश्यक आहे. यास्तव सदरील विषयपत्र दि.१७/०३/२००८ रोजी मा.महापालिका सभेपुढे ठेवणेत आले होते. तथापि महापालिका सभा ठराव क्रमांक ६५३ दि.०३/०६/२००९ अन्वये सदर विषयाबाबतचा विचार दि.१९/०६/२०१० चे सभेचेवेळी करणेत यावा असा निर्णय झाला.

मा.उपसचिव, नगरविकास विभाग महाराष्ट्र शासन यांचेकडील दि.२०/०१/२०१० चे पत्रामध्ये नमुद केलेप्रमाणे पिंपरी चिंचवड शहरातील अनाधिकृत

बांधकामे असणाऱ्या नगरसेवकांचे पद रद्द करणेबाबत मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे कलम ४४८ चा विचार करता कलम ४४८ नुसार याप्रकरणी हे आदेश प्राप्त झालेपासुन ३० दिवसात सदरचा विषय महासभेपुढे ठेवून अधिनियमातील तरतुदीप्रमाणे निर्णय घेण्यात यावा असे निदेश दिलेले आहेत.

तरी सदरील शासनाकडील पत्राच्या अनुषंगाने सदरचा विषय मा.महापालिका सभेपुढे निर्णयार्थ ठेवणेत यावा असा प्रस्ताव मा.आयुक्त यंाजकडून आला आहे. मा.आयुक्त यांचे प्रस्तावाप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

मा.विनायक रणसुभे :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

मा.जगदीश शेट्टी :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १६ चा विचार दि.२०/८/२०१० चे सभेचे वेळी करणेत यावा अशी सूचना मी मांडतो.

मा.प्रभाकर वाघेरे :- मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक :- ८८० विषय क्रमांक :- १६
दिनांक :-२०.०५.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.अति/२/कावि/४१/२०१० दि.१०.०२.२०१०
२) मा.महापालिका सभा ठराव क्र.८५७ दि.२१/०४/२०१० अन्वये

विषय क्रमांक १६ चा विचार दि.२०/८/२०१० चे सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल-७२ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

मा.विनायक रणसुभे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १७ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक :- १७
दिनांक :-२०.०५.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.प्रशासन/६/कावि/१८८/२०१० दि. ३१.३.२०१०
२) मा.महापालिका सभा ठराव क्र.८५८ दि.२१/०४/२०१०

अन्वये

<u>विषयाचा आशय</u> :- मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १३ नुसार श्री. उत्तम मुक्ताजी हिरवे-नगरसेवक यांचे पालिका सदस्यपद रद्द करुन त्यांच्याविरुध्द भा.द.वि.कलम ३५३ नुसार गुन्हा दाखल करण्यासाठी ३/४ पालिका सदस्यांची शिफारस शासनाकडे पाठविण्याबाबत.

वरील विषयाच्या आशयाचे दिनांक १९/०१/२०१० विषयपत्र प्रशासनाने मा.महापालिका सभेपुढे सादर केले होते. त्यानुषंगाने मा.महापालिका सभेने ठराव क्रमांक ८१९,दिनांक २०/०२/२०१० अन्वये " अधिनियमातील तरतुदीनुसार श्री. उत्तम मुक्ताजी हिरवे यांना कारणे दाखवा नोटीस देऊन त्यांचा खुलासा घ्यावा व खुलाशावरील अभिप्रायासह आयुक्तांनी फेरसादर करावे " असे आदेश दिले आहेत.

मा.महापालिका सभेच्या उक्त आदेशानुसार श्री.हिरवे-नगरसेवक यांचा खुलासा घेण्यासाठी दिनांक ०२/०३/२०१० ची नोटीस श्री.हिरवे यांच्यावर बजाविण्यात आली होती. या नोटीसीचा खुलासा श्री.हिरवे यांनी दिनांक १५/०३/२०१० चे पत्राने त्यांचे वकिलांमार्फत सादर केलेला आहे. नोटीसीचे खुलाशात श्री.हिरवे यांनी घटना घडल्याचे नाकारले आहे. कोणत्याही महापालिका कर्मचा-यांस मारहाण केली नाही. साफसफाईचे काम शांततेने करुन घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. श्री. काळे मुकादम यांनी राजकीय हेतुने पोलीस चौकीमध्ये तक्रार दाखल केलेली आहे. त्यामुळे सदर तक्रारीचा गुणवत्तेनुसार निर्णय होईपर्यंत पालिका सदस्यत्व रद्द करण्याचा अधिकार महापालिका सभेस नाहीत ते बेकायदेशिर आहे. असा खुलासा श्री.हिरवे यांनी वकिलामार्फत सादर केलेला आहे.

श्री.हिरवे-नगरसेवक यांचा उक्त खुलासा स्वीकारणे योग्य नाही. त्यांनी पालिकेच्या अपंग कर्मचा-यांस मारहाण केलेली आहे. सदर कर्मचा-यांस वाय.सी.एम.रुग्णालयात उपचार घेणे भाग पडले आहे. श्री.हिरवे यांनी ते निर्दोष असल्याबाबत कोणतेही संयुक्तीक कारण दिलेले नाही. घटना घडलेली असतांना वर्तमानपत्रातुनही घटनेस प्रसिध्दी मिळालेली असतांना व वस्तुस्थितीनुसार तसे स्पष्ट दिसून येत असतांना केवळ घटना घडली नाही असे अभिवेदन देऊन श्री.हिरवे हे महापालिका सभेची दिशाभुल करीत आहेत. पोलीस चौकीत दाखल झालेली तक्रार व महापालिका सभेपुढे निर्णयार्थ दाखल असलेले विषयपत्र या दोन्ही भिन्न बाबी आहेत. मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियमातील कलम १३ नुसार श्री.हिरवे यांचे पालिका सदस्यपद रद्द करण्याबाबत शासनाकडे शिफारस करण्याचा यथोचित निर्णय घेणे कायदेशिर बाब आहे.

सबब श्री.हिरवे-नगरसेवक यांचेवर बजाविलेल्या नोटीसीची प्रत व त्यांनी वकिलामार्फत सादर केलेल्या खुलाशाची प्रत मा.महापालिका सभेच्या अवलोकनार्थ (सोबत जोडलेली आहे) सादर करुन श्री.हिरवे यांचे पालिका सदस्यपद रद्द करण्याबाबत शासनाकडे शिफारस करण्याचा यथोचित निर्णय घेण्यासाठी प्रस्तुत विषय मा.महापालिका सभेपुढे सादर करावा असा प्रस्ताव मा.आयुक्त यांजकडून आला आहे मा.आयुक्त यांचे प्रस्तावाप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

मा.जगदीश शेट्टी :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १७ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा अशी सूचना मी मांडतो.

मा.प्रभाकर वाघेरे :- मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक :- ८८१ विषय क्रमांक :- १७
दिनांक :-२०.०५.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक
क्र.प्रशासन/६/कावि/१८८/२०१० दि. ३१.३.२०१०
२) मा.महापालिका सभा ठराव क्र.८५८ दि.२१/०४/२०१०
अन्वये

विषय क्रमांक १७ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल-७२ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

मा.उल्हास शेट्टी :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १८ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक :- ८८२ विषय क्रमांक :- १८
दिनांक :-२०.०५.२०१० विभाग :- मा.नगरसचिव

मा.विधी समिती

अ) दि. २०/२/२०१०, ५/३/२०१० व १९/३/२०१० चे सभेचा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ब) दि. ५/३/२०१० व १९/३/२०१० चे सभेचा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

क) दि. १९/३/२०१० चे सभेचा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

मा.काळूराम पवार :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल-७२ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

मा.उल्हास शेट्टी :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १९ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक :- ८८३ विषय क्रमांक :- १९

दिनांक :-२०.०५.२०१० विभाग :- मा.नगरसचिव

मा.झोपडपट्टी सुधार, गृहनिर्माण आणि समाजकल्याण समिती

अ) दि. ३/३/२०१०, १७/३/२०१० व २२/३/२०१० चे सभेचा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ब) दि. १७/३/२०१० व २२/३/२०१० चे सभेचा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

मा.काळुराम पवार :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल-७२ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

मा.उल्हास शेट्टी :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २० वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक :- ८८४ विषय क्रमांक :- २०

दिनांक :-२०.०५.२०१० विभाग :- मा.नगरसचिव

## मा.क्रिडा समिती

दि. ७/४/२०१० चे सभेचा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

मा.काळुराम पवार :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल-७२ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २१ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक :- ८८५ विषय क्रमांक :- २१
दिनांक :-२०.०५.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.आयुक्त सो. यांचेकडील पत्र नरवि/कावि/१अ/२३/१० दि. १८/१/२०१०
२) मा.ब प्रभाग समितीकडील ठराव क्र.१७० दि.१०/२/२०१०

विषय :- मौजे रावेत ता.हवेली येथील मंजूर विकास योजनेतील रावेत गावठाण ते धर्मराज मंगल कार्यालय ते किंवळे हद्दीपर्यंत १८.०० मी.रस्ता रुंदीखालील जागेचे भूसंपादन करणेबाबत.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव हद्दीच्या मंजुर विकास योजनेतील मौजे रावेत ता.हवेली येथील विकास योजनेतील रावेत गावठाण ते धर्मराज मंगल कार्यालय ते किवळे हद्दीपर्यंत १८.०० मी.रस्ता रुंदी या प्रस्तावाने बाधित होणा-या खाजगी मिळकतीचे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ (२) व भूसंपादन कायदा १८९४ चे तरतुदीनुसार भूसंपादन करावे लागेल. या भूसंपादनास व याकामी येणा-या खर्चास (संबंधित भूमिसंपादन अधिकारी कळवतील ती नुकसान भरपाईची रक्कम ) मान्यता देणेत येत आहे.

मा.विनायक रणसुभे :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

मा.उल्हास शेट्टी :- मा.महापौर साहेब, या अगोदर पिंपरी चिंचवड मध्ये ब-याचशा जागा ताब्यात घेतलेल्या आहेत आणि पैसे शासनाला वर्ग केलेले होते. आतापर्यंत किती जागा ताब्यात आलेल्या आहेत. कामे होत नाहीत. महापालिकेकडे पैसे नाहीत त्यापेक्षा टिडीआर द्यावा.

मा.विनायक रणसुभे :- मा.महापौर साहेब, याची माहिती पुढच्यावेळेस सदस्यांना द्यावी तो पर्यंत हा विषय तहकूब ठेवावा.

मा.अविनाश पाटिल :- मा.महापौर साहेब, रावेत येथील १८ मी.रस्तारुंदी आहे
(उपसंचालक) त्याबद्यल भूसंपादन करावे लागेल. साधारणता क्षेत्र जवळपास २.८३ हेक्टर आहे त्याची अंदाजे किमंत ३ कोटीच्या जवळपास येते. संबंधीतांना टिडीआरच्या माध्यमातून देत आहोत.

मा.उल्हास शेट्टी :- मा.महापौर साहेब, आपण किती पैसे दिलेले आहेत आणि किती ताब्यात आलेले आहे. याची माहिती पुढच्या मिटिंगला द्यावी. पैसे कशाला देता टिडीआर द्यावा. त्यांच्याशी चर्चा करावी.

मा.अविनाश पाटिल :- मा.महापौर साहेब, आपण प्रपोजल सादर करतो त्यावेळेला सभागृहाचा ठराव लागतो. पैसे देण्यास दिड ते दोन वर्षे लागतात त्यावेळेला लोकांना पत्र देवून हे करता येईल.

मा.आझमभाई पानसरे :- मा.महापौर साहेब, आता रस्ता ताब्यात घ्यायचा झालातर पैसे भरल्यानंतर आपल्याला त्या जागेचा ताबा किती वर्षानी मिळतो आणि आपले पैसे किती दिवस ट्रेझरीमध्ये जमा करावे लागतात. पुर्वी पैसे भरुन कधीही जागा ताब्यात आलीतर चालायचे परंतु आज प्रत्येक नगरसेवकाला वाटते आपल्या वॉर्डातील काम व्हावे.महापालिकेची पुर्वीसारखी परिस्थिती राहिली नाही. ट्रेझरीमध्ये बरीचशी रक्कम जमा केलेली आहे अजून द्यायचे झालेतर हि रक्कम तीन कोटी आहे. ग्रीनझोनसाठी द्यायचे ते द्यावे परंतु एलो झोनसाठी टिडीआर द्यावा. ग्रीन झोनसाठी पैसे भरावे एलो झोनसाठी भरण्याची गरज नाही लोक टिडीआर घेतील.

मा.अविनाश पाटिल :- मा.महापौर साहेब, पुर्वी आपण कलम ६ प्रमाणे पैसे मागिलेतर द्यायचो परंतु तीन वर्षापुर्वी आपण जिल्हाधिकारी यांच्याकडे एफ.डी.ठेवलेली आहे, त्याचा आपल्याकडे इन्ट्रेस्ट येतो त्याच्या अगेन्सट हे करतो. सगळेच रस्ते टिडीआरने येत नाहीत. जसा लोकांचा रिस्पॉन्स येतो तसे आपण करतो उरलेले भूसंपादन करावे लागते.

मा.महापौर :- टिडीआर देवून जागा संपादन करावी. आपले पैसे वाचायला पाहिजेत असा हेतू आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल-७२ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २२ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक :- ८८६ विषय क्रमांक :- २२

दिनांक :-२०.०५.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.हरिभाऊ तिकोने, अध्यक्ष, ब प्रभाग समिती यांचेकडील पत्र दि. १०/२/२०१०

२) मा. ब प्रभाग समितीकडील ठराव क्र. १७४ दि.१०/२/२०१०

विषय :- वॉर्ड क्र. ६४ गावठाण स.नं. ५९६ मधील खोकलाई देवी ग्रामदेवस्थान पाराचे रुंदीकरणात वगळणेबाबत.

वॉर्ड क्र. ६४ चिंचवड गावठाण स.नं. ५९६ मधील मंजुर विकास योजनेप्रमाणे रस्ता रुंदीकरण प्रस्तावित आहे. सदर रस्ता रुंदीकरणामध्ये चिंचवड गावातील जागृत खोकलाई देवी मंदिर ग्रामदेवस्थान येत आहे. खोकलादेवी ही जागृत पुरातन मंदीर असल्याने भाविकांच्या भावनेशी निगडीत आहे. सदर मंदिराची पुजाअर्चा येथील रहिवाशी श्री.सोमनाथ दशरथ तिकोने हे व त्यांच्या मागील तीन पिढयांपासून पुर्वापार करीत आहेत. याठिकाणी गावातील महिला वटसावित्री पौर्णिमाचे धार्मिक व इतर सांस्कृतिक कार्यक्रम, उत्सव ठिकठिकाणी वारंवार होत असतात. तेथे पुरातन वटवृक्ष, लिंबाचे झाड, जांभळाचे झाड अशा प्रकारचे अनेक झाडे त्या पाराच्या भोवतीने लावणेत आले आहेत.

स.नं. ५९६ मधील हा भाग चिंचवड गावातील गावठाणाचा भाग आहे. सदर खोकलाई देवी ग्राम देवस्थान आहे. सदर पारामुळे रहदारीस कोणत्याही प्रकारे अडचण होत नाही. तसेच मंदिराच्या पारावरील झाडामुळे सदर चौकात शोभा होते. तसेच चिंचवड गावठाणातील इतर मंदिराचे व धार्मिक स्थळांच्या बाबतीत मंदिर/पारांचा भाग वगळून ज्या प्रमाणे रस्ता रुंदीकरण करण्यात आले आहे त्याप्रमाणे गावातील नागरिकांचा/ग्रामस्थांचा धार्मिक भावनांचा विचार करुन खोकलाई देवी ग्रामदेवस्थान पाराचे रस्ता रुंदीकरण रद्य करुन पाराच्या मागील बाजुने सर्व्हे नं. ५९३/१,५९४,५९५ व ५९६ मधील जो पुर्वापार रस्ता होता. त्या रस्त्यावरील झालेले अतिक्रमण काढून टाकण्यात येऊन तेथे रस्ता रुंदीकरण

करण्याची कार्यवाही महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना व अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही ठेवून शासनास मान्यतेसाठी सादर करणेकरीता मान्यता देणेत येत आहे.

मा.विनायक रणसुभे :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल-७२ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २३ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक :- २३

दिनांक :-२०.०५.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.आयुक्त यांचेकडील क्र.नरवि/कावि/वडमुख/०५/१० दि.२५/०१/२०१०

२) मा.क प्रभाग समितीकडील ठराव क्र.१४०३ दि.३/२/२०१०

विषय :- भूसंपादन.

मौजे-वडमुखवाडी ता.हवेली येथील स.नं. ६२पै,६३पै.व ६६ पै. यामधील आ.क्र.२/४३ उंच पाण्याची टाकी खाजगी जागेचे भूसंपादन करणेबाबत.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या भागश: मंजुर विकास योजनेतील मौजे-वडमुखवाडी ता.हवेली येथील स.नं. ६२पै,६३पै.व ६६ पै. यामधील आ.क्र.२/४३ उंच पाण्याची टाकी या प्रस्तावाने बाधित होणा-या खाजगी मिळकतीचे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ (२) व भूसंपादन कायदा १८९४ तरतुदीतील तातडीचे कलमासह भूसंपादन करावे लागेल. या भूसंपादनास व याकामी येणा-या खर्चास (संबंधित भूमिसंपादन अधिकारी कळवतील ती नुकसान भरपाईची रक्कम) मान्यता देणेत येत आहे.

मा.आर.एस.कुमार :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

मा.विनायक रणसुभे :- मा.महापौर साहेब, मी पुढील प्रमाणे उपसूचना मांडतो-बाबाजी मारूती चेंडके रा.दत्तनगर, निगडी, पुणे-४४ यांना घरगुती वापरासाठी अर्धा इंची नळजोड हद्दीबाहेर देण्यास मान्यता देणेत यावी.

मा.उत्तम हिरवे :- मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन देतो.

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक :- ८८७ विषय क्रमांक :- २३
दिनांक :-२०.०५.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.आयुक्त यांचेकडील क्र.नरवि/कावि/वडमुख/०५/१० दि.२५/०१/२०१०
२) मा.क प्रभाग समितीकडील ठराव क्र.१४०३ दि.३/२/२०१०

विषय :- भूसंपादन.
मौजे-वडमुखवाडी ता.हवेली येथील स.नं. ६२पै,६३पै.व ६६ पै. यामधील आ.क्र.२/४३ उंच पाण्याची टाकी खाजगी जागेचे भूसंपादन करणेबाबत.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या भागश: मंजुर विकास योजनेतील मौजे-वडमुखवाडी ता.हवेली येथील स.नं. ६२पै,६३पै.व ६६ पै. यामधील आ.क्र.२/४३ उंच पाण्याची टाकी या प्रस्तावाने बाधित होणा-या खाजगी मिळकतीचे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ (२) व भूसंपादन कायदा १८९४ तरतुदीतील तातडीचे कलमासह भूसंपादन करावे लागेल. या भूसंपादनास व याकामी येणा-या खर्चास (संबंधित भूमिसंपादन अधिकारी कळवतील ती नुकसान भरपाईची रक्कम) मान्यता देणेत येत आहे. बाबाजी मारूती चेंडके रा.दत्तनगर, निगडी, पुणे-४४ यांना घरगुती वापरासाठी अर्धा इंची नळजोड हद्दीबाहेर देण्यास मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल-७२ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २४ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक :- २४

दिनांक :-२०.०५.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.आयुक्त यांचेकडील क्र.नरवि/२ब/च-होली/०४/२०१० दि.२५/१/२०१०

२) मा.क प्रभाग समितीकडील ठराव क्र.१४०४ दि.३/२/२०१०

विषय - मौजे च-होली येथील सं.नं.४०० पै,४०१पै,४०३पै मध्ये मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २०५ अन्वये महापालिकेचा रस्ता घोषीत करणेबाबत.

मौजे च-होली येथील स.नं.४०० पै,४०१पै,४०३पै मध्ये पठारे वस्ती या भागातील रहिवाशीयांना सद्यस्थितीत मुख्य रस्त्यास मिळणारा आवश्यक रुंदीचा पोहोच मार्ग उपलब्ध नाही. त्यामुळे सदर रहिवाशीयांच्या अडीअडचणींचा यथोचित विचार करुन तेथील लोक प्रतिनिधींनी सदर ठिकाणी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २०५ अन्वये महानगरपालिकेचे रस्ते (म्युनिसिपल रोड) घोषित करण्याबाबतचा प्रस्ताव मा.प्रभाग समितीचे ठराव क्रमांक १२४१,दि. ५/८/२००९ अन्वये घोषीत करणेस मान्यता देण्यात आली आहे.

सदर ठरावाच्या अनुषंगाने नागरीकांच्या हरकती/सूचना मागविण्याकरिता स्थानिक वृत्तपत्रात जाहीर नोटीस प्रसिध्द ( दै.सामना, दि.२७/८/२००९) करण्यात आली आहे. प्रस्तुत जाहीर सुचनेच्या अनुषंगाने सदर भागातील नागरीकांनी दाखल केलेल्या हरकतीचे अनुषंगाने दि. ११/१२/२००९ रोजी मा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचेकडे संबंधीत नागरीकांना सुनावणी देण्यात आली असून सदर रस्त्यास नागरीकांचा विरोध असला तरी सदर रस्त्याने कुठलीही घरे बाधीत नसल्याने व पठारे मळा येथील नागरीकांच्या सोईकरीता सदर ६.० मी रस्ता आवश्यक असल्याने सदर रस्ता अंतिमरित्या घोषित करणेकामी व सदर रस्ता भूसंपादन करणेकामी मान्यता देणेत येत आहे.

मा.विनायक रणसुभे :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

मा.उल्हास शेट्टी :- मा.महापौर साहेब, मी पुढील प्रमाणे उपसूचना मांडतो-वाकड येथील मौजे हिंजवडी गावचे हद्दीलगत असणाऱ्या मनपाच्या भागशः मंजुर विकास आराखड्यानुसार मौजे वाकड येथील सर्व्हे नं.६५ व ७१ मधुन जाणाऱ्या ३० मीटर रूंदीचे दोन्ही रस्त्यास जोडणारा व मौजे वाकड सर्व्हे नं.७०, ७१, ६५, ६१ मधुन १२ मीटर रूंद किंवा १८ मीटर रूंद रस्ता मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम १९४९ चे

कलम २०५ अन्वये महापालिकेचे रस्ते (Municipal Roads) अन्वये घोषित करणेस व त्याप्रमाणे भूसंपादन करणेस मान्यता देणेत यावी. पिंपरी चिंचवड येथिल स.नं.३४४, ३४५, ३४६ मधील भागशः मंजुर विकास योजने नुसार मौजे चऱ्होली येथिल स.नं.३५३/६ (जुना स.नं.३८९) ह्या मिळकतीचा काही भाग आ.क्र.२/१०१ उद्यान या प्रयोजनाने बाधित होत असून उर्वरित भाग निवासी विभागात समाविष्ट आहे. तसेच विकास योजनेत अस्तित्वातील रस्ता हा स.नं.३४४ (जुना ३८०) स.नं. ३४६ (जुना ३८२) स.नं.३४७ (जुना ३८३) स.नं.३४८ (जुना ३८४) स.नं.३४९ (जुना ३८५) मध्ये दर्शविण्यात आला असून सदर रस्त्यास १८.० रस्तारूंदीकरण प्रस्तावित केले आहे. तथापि प्रत्यक्ष जागेवर मोजणी नकाशा व प्रत्यक्ष पाहणी केली असता अस्तित्वातील रस्ता हा प्रत्यक्षात स.नं.३५३ (जुना ३८९) लगत स.नं.३८३ (जुना ३८३) स.नं.३४९ (जुना ३८५) मध्ये आहे. तथापि विकास योजनेतील रस्तारूंदी ही अस्तित्वातील रस्त्यास दर्शविलेली असल्याने सदर प्रत्यक्ष जागेवरील अस्तित्वातील रस्ता रूंदीकरण प्रस्तावित करणे आवश्यक आहे. तरी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये सदर प्रत्यक्ष जागेवरील रस्त्यास १८.० मी. रस्ता आखणी करणे आवश्यक आहे. तसेच सदर आखणीत फेरबदल करताना सदर रस्ता आखणी लगत असलेली आरक्षण क्र.२/१०१ उद्यान व आ.क्र. २/१०० सांस्कृतिक केंद्र व वाचनालय ही आरक्षणे देखील स्थलबदल करणेस रस्ता भूसंपादन करणेस मान्यता देणेत यावी. मौजे सांगवी येथील स.नं. मधून नियोजित पुणे व पिंपरी चिंचवड महापालिका यांना जोडणारा मुळा नदीवरील नियोजित सांगवी-बोपोडी पुलाकरीता जोड रस्ता आवश्यक असून सदर पुलाचे नकाशाप्रमाणे सांगवी हद्दीतून असणाऱ्या भागातून स.नं.३ मधुन १८ मीटर रूंद रस्ता करणे गरजेचे आहे. याकरिता मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम १९४९ चे कलम २०५ अन्वये महापालिकेचे रस्ते (Municipal Road) म्हणून घोषित करणेस व १८ मीटर रूंदी प्रमाणे नियोजित पुलापर्यंत भूसंपादन करणेस (सदर १८ मीटर रस्ता उत्तर-दक्षिण असा आहे व दापोडी ते बोपोडी रस्ता जोडण्यात यावा) मान्यता देणेत यावी.

मा.राज मिसाळ :- मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन देतो.

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

मा.श्रीरंग बारणे :- मा.महापौर साहेब, कलम २०५ खाली आपण रस्ते घोषित करतो. त्याला प्रभाग समितीची मान्यता असल्यानंतर महापालिका सभेकडे येण्याची गरज नाही. हा विषय महापालिका सभेकडे कसाकाय आला.

मा.अविनाश पाटिल :- मा.महापौर साहेब, कलम २०५ डिक्लेअर पर्यंत प्रभागाला अधिकार आहेत भूसंपादनासाठी महापालिका सभेची मान्यता आवश्यक आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक :- ८८८ विषय क्रमांक :- २४

दिनांक :-२०.०५.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.आयुक्त यांचेकडील क्र.नरवि/२ब/च-होली/०४/२०१० दि.२५/१/२०१०

२) मा.क प्रभाग समितीकडील ठराव क्र.१४०४ दि.३/२/२०१०

विषय - मौजे च-होली येथील सं.नं.४०० पै,४०१पै,४०३पै मध्ये मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २०५ अन्वये महापालिकेचा रस्ता घोषीत करणेबाबत.

मौजे च-होली येथील स.नं.४०० पै,४०१पै,४०३पै मध्ये पठारे वस्ती या भागातील रहिवाशीयांना सद्यस्थितीत मुख्य रस्त्यास मिळणारा आवश्यक रुंदीचा पोहोच मार्ग उपलब्ध नाही. त्यामुळे सदर रहिवाशीयांच्या अडीअडचणींचा यथोचित विचार करुन तेथील लोक प्रतिनिधींनी सदर ठिकाणी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २०५ अन्वये महानगरपालिकेचे रस्ते (म्युनिसिपल रोड) घोषित करण्याबाबतचा प्रस्ताव मा.प्रभाग समितीचे ठराव क्रमांक १२४१,दि. ५/८/२००९ अन्वये घोषीत करणेस मान्यता देण्यात आली आहे.

सदर ठरावाच्या अनुषंगाने नागरीकांच्या हरकती/सूचना मागविण्याकरिता स्थानिक वृत्तपत्रात जाहीर नोटीस प्रसिध्द ( दै.सामना, दि.२७/८/२००९) करण्यात आली आहे. प्रस्तुत जाहीर सुचनेच्या अनुषंगाने सदर भागातील नागरीकांनी दाखल केलेल्या हरकतीचे अनुषंगाने दि. ११/१२/२००९ रोजी मा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचेकडे संबंधीत नागरीकांना सुनावणी देण्यात आली असून सदर रस्त्यास नागरीकांचा विरोध असला तरी सदर रस्त्याने कुठलीही घरे बाधीत नसल्याने व पठारे मळा येथील नागरीकांच्या सोईकरीता सदर ६.० मी रस्ता आवश्यक असल्याने सदर रस्ता अंतिमरित्या घोषित करणेकामी व सदर रस्ता भूसंपादन करणेकामी मान्यता देणेत येत आहे. वाकड येथील मौजे हिंजवडी गावचे हद्दीलगत असणाऱ्या मनपाच्या भागशः मंजुर विकास आराखड्यानुसार मौजे वाकड येथील सर्व्हे नं.६५ व ७१ मधुन जाणाऱ्या ३० मीटर रूंदीचे दोन्ही रस्त्यास जोडणारा व मौजे वाकड सर्व्हे नं.७०, ७१, ६५, ६१ मधुन १२ मीटर रूंद किंवा १८ मीटर रूंद रस्ता मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम १९४९ चे कलम २०५ अन्वये महापालिकेचे रस्ते (Municipal Roads) अन्वये घोषित करणेस व त्याप्रमाणे भूसंपादन करणेस मान्यता देणेत येत आहे. पिंपरी चिंचवड येथिल स.नं.३४४, ३४५, ३४६ मधील भागशः मंजुर विकास योजने नुसार मौजे चऱ्होली येथिल स.नं.३५३/६ (जुना स.नं.३८९) ह्या

मिळकतीचा काही भाग आ.क्र.२/१०१ उद्यान या प्रयोजनाने बाधित होत असून उर्वरित भाग निवासी विभागात समाविष्ट आहे. तसेच विकास योजनेत अस्तित्वातील रस्ता हा स.नं.३४४ (जुना ३८०) स.नं. ३४६ (जुना ३८२) स.नं.३४७ (जुना ३८३) स.नं.३४८ (जुना ३८४) स.नं.३४९ (जुना ३८५) मध्ये दर्शविण्यात आला असून सदर रस्त्यास १८.० रस्तारूंदीकरण प्रस्तावित केले आहे. तथापि प्रत्यक्ष जागेवर मोजणी नकाशा व प्रत्यक्ष पाहणी केली असता अस्तित्वातील रस्ता हा प्रत्यक्षात स.नं.३५३ (जुना ३८९) लगत स.नं.३८३ (जुना ३८३) स.नं.३४९ (जुना ३८५) मध्ये आहे. तथापि विकास योजनेतील रस्तारूंदी ही अस्तित्वातील रस्त्यास दर्शविलेली असल्याने सदर प्रत्यक्ष जागेवरील अस्तित्वातील रस्ता रूंदीकरण प्रस्तावित करणे आवश्यक आहे. तरी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये सदर प्रत्यक्ष जागेवरील रस्त्यास १८.० मी. रस्ता आखणी करणे आवश्यक आहे. तसेच सदर आखणीत फेरबदल करताना सदर रस्ता आखणी लगत असलेली आरक्षण क्र.२/१०१ उद्यान व आ.क्र. २/१०० सांस्कृतिक केंद्र व वाचनालय ही आरक्षणे देखील स्थलबदल करणेस रस्ता भूसंपादन करणेस मान्यता देणेत येत आहे. मौजे सांगवी येथील स.नं. मधून नियोजित पुणे व पिंपरी चिंचवड महापालिका यांना जोडणारा मुळा नदीवरील नियोजित सांगवी-बोपोडी पुलाकरीता जोड रस्ता आवश्यक असून सदर पुलाचे नकाशाप्रमाणे सांगवी हद्दीतून असणाऱ्या भागातून स.नं.३ मधुन १८ मीटर रूंद रस्ता करणे गरजेचे आहे. याकरिता मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम १९४९ चे कलम २०५ अन्वये महापालिकेचे रस्ते (Municipal Road) म्हणून घोषित करणेस व १८ मीटर रूंदी प्रमाणे नियोजित पुलापर्यंत भूसंपादन करणेस (सदर १८ मीटर रस्ता उत्तर-दक्षिण असा आहे व दापोडी ते बोपोडी रस्ता जोडण्यात यावा) मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल-७२ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २५ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक :- २५

दिनांक :-२०.०५.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.आयुक्त यांचेकडील क्र.नरवि/कावि/३५/१४७/१०, दि.३/२/२०१०

२) मा.क प्रभाग समितीकडील ठराव क्र.१४१२ दि.३/२/२०१०

विषय :- मौजे दापोडी येथील स.नं. ३६ पैकी जल संपदा विभागाची १ हेक्टर

जमीन मैला शुध्दीकरण प्रकल्पासाठी आरक्षित करणेबाबत.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची वाढीव हद्यीची विकास योजना महाराष्ट्र शासन,नगर विकास विभाग,अधिसुचना क्र. टीपीएस-१८०८/८९४/सीआर-१७२७/०९/युडी-१३,दिनांक १८ ऑगस्ट २००९ अन्वये मंजूर झालेली आहे.
जवाहरलाल नेहरु नागरी पुन:निर्माण योजने अंतर्गत मैला शुध्दीकरण प्रकल्प विकसित करावयाचा आहे. त्यासाठी म.न.पा. चे जल नि:सारण व पाणी पुरवठा विभागाने मौजे दापोडी येथील स.नं. ३६ पैकी १ हेक्टर जागा निश्चित केलेली आहे. सदरची जमीन जल संपदा विभागाचे मालकीची असून, मंजूर विकास योजनेनुसार ती औद्योगिक विभागात समाविष्ट आहे. तसेच सदर जागा म.न.पा.स हस्तांतरित करणेकामी जलनि:सारण व पाणीपुरवठा विभागामार्फत शासन स्तरावर पाठपुरावा करण्यात येत आहे.

सदर जमिनीपैकी १ हेक्टर जमीन पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस मैला शुध्दीकरण प्रकल्पासाठी आवश्यक असल्यामुळे प्रस्तूत जमीन मैला शुध्दीकरण प्रकल्प या कारणास्तव आरक्षित करणे आवश्यक आहे. त्यामुळे म.प्रा.व न.र. अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये विहीत कार्यवाही करुन हा प्रस्ताव शासनाची मान्यता मिळणेकामी पाठविणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.विनायक रणसुभे :- मा.महापौर साहेब,ठरावाला अनुमोदन देतो.

मा.उल्हास शेट्टी :- मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो-मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत नियम क्रमांक ११.३.१ नुसार चटई क्षेत्र निर्देशांक गणना करताना रेखांकन करताना जर जागेचे क्षेत्र ०.२० हेक्टर (२००० चौ.मी.) ते ०.३६ हेक्टर (३६०० चौ.मी.) च्या दरम्यान असेल तर रस्ता व खुली जागा यासाठी नियोजित करण्यात आलेले क्षेत्र चटई क्षेत्र निर्देशांक गणना करताना वजा करण्यात येऊ नये. तसेच रेखांकन करताना जर जागेचे क्षेत्र ०.३६ हेक्टर (३६०० चौ.मी.) पेक्षा जास्त असेल तर चटई क्षेत्र निर्देशांक गणना करताना फक्त खुल्या जागेचे क्षेत्र वजा करणेत यावे, परंतू रस्त्याचे क्षेत्र वजा करणेत येऊ नये. परंतु नियम क्रमांक ११.४.४ नुसार चटई क्षेत्र निर्देशांक गणना करताना निव्वळ भुखंड क्षेत्र (Net area of the plot) विचारात घेणेत यावे, तसेच अश्या रेखांकनातील निव्वळ भुखंड क्षेत्र (Net area of the plot) गणना करताना एकुण भुखंड क्षेत्रातून (gross area of the plot) रस्त्याखालील (means of access), खुली जागा आणि सुविधा भुखंडाचे (recreational and amenity open space) क्षेत्र वजा करणेत यावे. अशी तरतूद आहे. नियम क्रमांक ११.३.१ नुसार तरतूद विचारात घेता नियम क्रमांक ११.४.४ मधील तरतुदीमध्ये प्रामुख्याने रस्त्याचे क्षेत्राबाबत विसंगती आहे. तरी नियम क्रमांक ११.३.१ नुसार तरतुदीशी सुसंगत बदल नियम क्रमांक ११.४.४ मधील

तरतुदीमध्ये करणे आवश्यक आहे. मुळ नियम क्रमांक ११.४.४ रद्द करून, सुधारित नियम क्रमांक ११.४.४ खालील प्रमाणे मंजुर विकास नियमावलीमध्ये समाविष्ट करणेकामी मुं.प्रां. व न.र. अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये मंजुर विकास नियमावली मध्ये फेरबदल करणेकामी व त्यासाठी नागरीकांच्या सुचना व हरकती मागवून, विहीत कार्यवाही पुर्ण करून फेरबदल प्रस्ताव शासनाचे अंतिम मान्यतेसाठी पाठविण्यास मा.आयुक्त यांना प्राधिकृत करण्यास मान्यता देणेत यावी.

११.४.४ F.A.R./Built-up area/Tenement density Calculation on Net Plot Area- For the purpose of F.A.R./Built-up area/Tenement density Calculation the Net Plot Area shall only be considered. In the case of layout for land area admeasuring between ०.२० Ha. To ०.३६ Ha. While calculating Net plot area no deduction for recreational open space and internal road shall be made. But in the case of layout for land area admeasureing above ०.३६ Ha. While calculating Net plot area deduction for recreational open space and Amenity space shall be made and no deduction for internal road shall be made, considering the provision stipulated in rule no. ११.३.१.

मा.राजू मिसाळ :- मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन देतो.

मा.मंगलाताई कदम :- मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते-शाहु महाराजांचे तैल चित्र सभागृहात २१ जुन रोजी जयंती निमित्त लावणेस मान्यता देणेत यावी.

मा.शोभा आदियाल :- मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन देते.

मा.महापौर :- मंगलाताईनी जी सूचना केली त्याची त्वरीत दखल घेवून २१ जून ला शाहु महाराजांचे तैल चित्र लावावे.

मा.भाऊसाहेब भोईर :- मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो-राजीव गांधी यांचे तैल चित्र सभागृहात लावणेस मान्यता देणेत यावी.

मा.जगदीश शेट्टी :- मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन देतो.

मा.उत्तम हिरवे :- मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- आण्णाभाऊ साठे यांचे तैल चित्र सभागृहात लावणेस मान्यता देणेत यावी.

मा.रामअधार धारिया :- मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन देतो.

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब,मा.उत्तम हिरवे व मा.रामअधार धारिया यांची,मा.भाऊसाहेब भोइर व मा.जगदीश शेट्टी यांची, मा.मंगलाताई कदम व मा.शोभा आदियाल यांची, मा.उल्हास शेट्टी व मा.राजू मिसाळ यांची उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनांप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक :- ८८९ विषय क्रमांक :- २५

दिनांक :-२०.०५.२०१० विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.आयुक्त यांचेकडील क्र.नरवि/कावि/३५/१४७/१०, दि.३/२/२०१०

२) मा.क प्रभाग समितीकडील ठराव क्र.१४१२ दि.३/२/२०१०

विषय :- मौजे दापोडी येथील स.नं. ३६ पैकी जल संपदा विभागाची १ हेक्टर जमीन मैला शुध्दीकरण प्रकल्पासाठी आरक्षित करणेबाबत.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची वाढीव हद्दीची विकास योजना महाराष्ट्र शासन,नगर विकास विभाग,अधिसुचना क्र. टीपीएस-१८०८/८९४/सीआर-१७२७/०९/युडी-१३,दिनांक १८ ऑगस्ट २००९ अन्वये मंजूर झालेली आहे. जवाहरलाल नेहरु नागरी पुन:निर्माण योजने अंतर्गत मैला शुध्दीकरण प्रकल्प विकसित करावयाचा आहे. त्यासाठी म.न.पा. चे जल नि:सारण व पाणी पुरवठा विभागाने मौजे दापोडी येथील स.नं. ३६ पैकी १ हेक्टर जागा निश्चित केलेली आहे. सदरची जमीन जल संपदा विभागाचे मालकीची असून, मंजूर विकास योजनेनुसार ती औद्योगिक विभागात समाविष्ट आहे. तसेच सदर जागा म.न.पा.स हस्तांतरित करणेकामी जलनि:सारण व पाणीपुरवठा विभागामार्फत शासन स्तरावर पाठपुरावा करण्यात येत आहे.

सदर जमिनीपैकी १ हेक्टर जमीन पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस मैला शुध्दीकरण प्रकल्पासाठी आवश्यक असल्यामुळे प्रस्तूत जमीन मैला शुध्दीकरण प्रकल्प या कारणास्तव आरक्षित करणे आवश्यक आहे. त्यामुळे म.प्रा.व न.र. अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये विहीत कार्यवाही करुन हा प्रस्ताव शासनाची मान्यता मिळणेकामी पाठविणेस मान्यता देणेत येत आहे. मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत नियम क्रमांक ११.३.१ नुसार चटई क्षेत्र निर्देशांक गणना करताना

रेखांकन करताना जर जागेचे क्षेत्र ०.२० हेक्टर (२००० चौ.मी.) ते ०.३६ हेक्टर (३६०० चौ.मी.) च्या दरम्यान असेल तर रस्ता व खुली जागा यासाठी नियोजित करण्यात आलेले क्षेत्र चटई क्षेत्र निर्देशांक गणना करताना वजा करण्यात येऊ नये. तसेच रेखांकन करताना जर जागेचे क्षेत्र ०.३६ हेक्टर (३६०० चौ.मी.) पेक्षा जास्त असेल तर चटई क्षेत्र निर्देशांक गणना करताना फक्त खुल्या जागेचे क्षेत्र वजा करणेत यावे, परंतू रस्त्याचे क्षेत्र वजा करणेत येऊ नये. परंतु नियम क्रमांक ११.४.४ नुसार चटई क्षेत्र निर्देशांक गणना करताना निव्वळ भुखंड क्षेत्र (Net area of the plot) विचारात घेणेत यावे, तसेच अश्या रेखांकनातील निव्वळ भुखंड क्षेत्र (Net area of the plot) गणना करताना एकुण भुखंड क्षेत्रातून (gross area of the plot) रस्त्याखालील (means of access), खुली जागा आणि सुविधा भुखंडाचे (recreational and amenity open space) क्षेत्र वजा करणेत यावे. अशी तरतूद आहे. नियम क्रमांक ११.३.१ नुसार तरतूद विचारात घेता नियम क्रमांक ११.४.४ मधील तरतुदीमध्ये प्रामुख्याने रस्त्याचे क्षेत्राबाबत विसंगती आहे. तरी नियम क्रमांक ११.३.१ नुसार तरतुदीशी सुसंगत बदल नियम क्रमांक ११.४.४ मधील तरतुदीमध्ये करणे आवश्यक आहे. मुळ नियम क्रमांक ११.४.४ रद्द करून, सुधारित नियम क्रमांक ११.४.४ खालील प्रमाणे मंजुर विकास नियमावलीमध्ये समाविष्ट करणेकामी मुं.प्रां. व न.र. अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये मंजुर विकास नियमावली मध्ये फेरबदल करणेकामी व त्यासाठी नागरीकांच्या सुचना व हरकती मागवून, विहीत कार्यवाही पुर्ण करून फेरबदल प्रस्ताव शासनाचे अंतिम मान्यतेसाठी पाठविण्यास मा.आयुक्त यांना प्राधिकृत करण्यास मान्यता देणेत येत आहे.११.४.४ F.A.R./Built-up area/Tenement density Calculation on Net Plot Area- For the purpose of F.A.R./Built-up area/Tenement density Calculation the Net Plot Area shall only be considered. In the case of layout for land area admeasuring between ०.२० Ha. To ०.३६ Ha. While calculating Net plot area no deduction for recreational open space and internal road shall be made. But in the case of layout for land area admeasureing above ०.३६ Ha. While calculating Net plot area deduction for recreational open space and Amenity space shall be made and no deduction for internal road shall be made, considering the provision stipulated in rule no. ११.३.१.

शाहु महाराजांचे तैल चित्र सभागृहात २१ जुन रोजी जयंती निमित्त लावणेस मान्यता देणेत येत आहे. राजीव गांधी यांचे तैल चित्र सभागृहात लावणेस मान्यता देणेत येत आहे. आण्णाभाऊ साठे यांचे तैल चित्र सभागृहात लावणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल-७२ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

मा.महापौर :- सर्वाचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर करणेत येत आहे.

(योगेश मंगलसेन बहल )
महापौर
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
नगरसचिव कार्यालय
क्रमांक - नस/ ९ /कावि/ ७२७ /१०
दिनांक :- २९ / ५ /२०१०

सही/-
नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांजकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.